# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २२९) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.११ सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## कच्च्या तेलाच्या किंमतीत पुन्हा मोठी वाढ

नवी दिल्ली दि.१० (वृत्तसंस्था)- आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमतीत पुन्हा एकदा मोठी वाढ झाल्याचे समोर आले आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्ध पुन्हा सुरु झाल्याचा थेट परिणाम कच्च्या तेलाच्या किमतींवर झाला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल १०५ डॉलरवर पोहोचल्या आहेत. दरम्यान, या कच्च्या तेलाच्या वाढत्या दराचा परीणाम भारतावर काय होणार का? पेट्रोल डिझेलचे दर वाढणार का? असा सवालही उपस्थित केला जात आहे. होर्मुझची सामुद्रधुनी जगभरातील कच्च्या तेलाच्या आयातीचा स्रोत आहे. भारत हा कच्च्या तेलाचा सर्वात मोठा आयातदार देश असून, त्याच्या कच्च्या तेलाचा एक मोठा हिस्सा याच मार्गाने येतो. त्यामुळे, कच्च्या तेलाच्या किमतीतील कोणत्याही चढ-उताराचा भारतावर थेट परिणाम होतो. फेब्रुवारीच्या अखेरीस युद्ध सुरू झाल्यापासून कच्च्या तेलाच्या किमती सातत्याने वाढत आहेत, मे महिन्यात तर पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत सलग चार वेळा वाढ झाली, जी एक मोठी वाढ होती. जेव्हा कच्च्या तेलाच्या किमती सातत्याने वाढत होत्या आणि कमी होण्याची कोणतीही चिन्हे दिसत नव्हती, तेव्हा मे महिन्यात पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत चार वेळा वाढ करण्यात आली. जरी भारत कच्च्या तेलाचा सर्वात मोठा आयातदार देश असला तरी, तो पूर्णपणे एकाच देशावर अवलंबून नाही. अनेक देशांमधून भारतात कच्चे तेल येते, त्यामुळे कोणत्याही एका देशाच्या मार्गावरील अवलंबित्व टाळले जाते.

## सरकारकडून एमपीएससी विद्यार्थ्यांच्या सर्व प्रमुख मागण्या मान्य

### मुख्यमंत्री फडणवीसांचे पेपर पुनर्तपासणीसह एसआयटी चौकशीचे आश्वासन, ८ दिवसांत कारवाईचे आदेश

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ च्या निकालावरून आणि कथित पेपरफुटीवरून आक्रमक झालेल्या एमपीएससी विद्यार्थ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विद्यार्थ्यांचे शिष्टमंडळ यांच्यात झालेली महत्त्वपूर्ण बैठक यशस्वी ठरली असून, विद्यार्थ्यांच्या सर्व प्रमुख मागण्या राज्य सरकारने मान्य केल्या आहेत. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी पेपरची पुनर्तपासणी करण्याचे आणि पेपरफुटीच्या प्रकरणाची थेट एसआयटी (विशेष तपास पथक) मार्फत सखोल चौकशी करण्याचे आश्वासन दिले आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील लाखो स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एमपीएससी विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळादरम्यान तब्बल पावणेदोन तास सविस्तर आणि सखोल चर्चा पार पडली. या चर्चेदरम्यान विद्यार्थ्यांनी आयोगाच्या कारभारावर आणि परीक्षेतील गोंधळावर आपले सर्व आक्षेप पुराव्यांसह मांडले. मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्व समस्यांचे गांभीर्याने निरसन केले. बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने सांगितले की, "आमच्या मुख्यमंत्र्यांसोबतच्या चर्चेत सर्व मागण्या मान्य झाल्या आहेत.

राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या पेपरची नव्याने पुनर्तपासणी केली जाईल. तसेच, पेपरफुटी प्रकरणात थेट एसआयटी चौकशी लावली जाईल." विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकरणात येत्या आठ दिवसांच्या आत ठोस कारवाई केली जाईल, असा स्पष्ट



शब्दही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्याची माहिती विद्यार्थ्यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेली बैठक सकारात्मक झाल्याचे आंदोलक विद्यार्थ्यांनी सांगितले. राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ संदर्भात गुणांची फेरतपासणी करण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचे विद्यार्थ्यांनी नमूद केले. तसेच मुलाखती पुढे ढकलण्याबाबतही चर्चा झाली. परीक्षेशी संबंधित सर्व बाबी व्ही. राधा समितीसमोर मांडण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. आरटीआयअंतर्गत आवश्यक कागदपत्रे व पेपर उपलब्ध करून देण्याबाबतही सकारात्मक आश्वासन मिळाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

दळवी समितीच्या माध्यमातून गुणांशी संबंधित मुद्द्यांवरही निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांना मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने पुढील काळात वातावरण अधिक सकारात्मक होईल, अशी अपेक्षा विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. मागण्या ठोसपणे मार्गी न लागल्यास पुन्हा आंदोलन करण्याचा अधिकार विद्यार्थ्यांना असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचे विद्यार्थ्यांनी नमूद केले.

## टोकाची भाषा सोडा, नाहीतर आंदोलनाची दिशा भरकटेल

### मराठा आरक्षणावर नरेंद्र पाटलांचा जरांगेंना थेट इशारा

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी आंदोलनकर्त्यांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली आहे. मराठा समाजाच्या मागण्या रास्त पद्धतीने आणि कायद्याच्या चौकटीत मांडल्या पाहिजेत; मात्र सरकारमधील नेत्यांवर एकेरी भाषेत टीका करणे, शिवीगाळ करणे किंवा टोकाची भूमिका घेणे योग्य नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

विशेषतः मनोज जरांगे पाटील आणि त्यांच्या आंदोलनाच्या भूमिकेवर टीका करताना नरेंद्र पाटील यांनी संयम राखण्याचे आवाहन केले. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या मागणीवर सरकारने पावले उचलली आहेत. मात्र प्रमाणपत्र मिळाल्यानंतर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदोपत्री पुरावे आणि वैधता पूर्ण करावी लागेल. त्यामुळे पुरावे नसताना सरसकट प्रमाणपत्र आणि आरक्षणाची मागणी करणे कायद्याच्या चौकटीत शक्य नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली.

याचवेळी नरेंद्र पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मराठा समाजासाठी केलेल्या कामांची यादीच पत्रकार परिषदेत मांडली. "मराठा समाजाला न्याय देण्याचे काम देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. त्यामुळे त्यांच्याबद्दल अशा पद्धतीने बोलणे योग्य नाही," असे ते म्हणाले.

नरेंद्र पाटील यांनी २०१६ मधील मराठा क्रांती मोर्चांचा संदर्भ देत आपल्या भूमिकेची सुरुवात केली. राज्यभर मोठ्या संख्येने मोर्चे निघाल्यानंतर मुंबईत महामोर्चा झाला. त्यावेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते. मराठा समाजाला आर्थिक निकषावर आरक्षण मिळावे, तसेच इतर समाजांप्रमाणे आर्थिक आणि शैक्षणिक संधी उपलब्ध व्हाव्यात, अशा मागण्या त्या काळात पुढे आल्याचे त्यांनी सांगितले.

या मागण्यांच्या पार्श्वभूमीवर फडणवीस सरकारने समित्या स्थापन करून मराठा आरक्षणाचा प्रश्न कायद्याच्या चौकटीत सोडवण्याचा प्रयत्न केला. त्याच काळात अण्णासाहेब पाटील (पान ४ वर)

## मनोज जरांगेंविरुद्ध थेट ईडीमध्ये तक्रार

### वाळू तस्करी केल्याचा अजय बारसकर यांचा आरोप

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- मराठा आरक्षण अभ्यासक अजय बारसकर मनोज जरांगेंविरुद्ध चांगलेच आक्रमक झाले आहेत. आता अजय बारसकर यांनी थेट ईडीमध्ये जरांगेंविरुद्ध तक्रार केली असल्याची माहिती समोर आली आहे. अजय बारसकर यांनी याबाबतची माहिती दिली आहे, ईडीच्या कार्यलयासमोरून ही माहिती त्यांनी सांगितली आहे. बारसकर म्हणाले, "मनोज जरांगे आणि त्यांचे जे सगळे सहकारी आहेत, त्या सर्वांनी मराठा आरक्षण आंदोलनाच्या नावाखाली प्रचंड मोठा भ्रष्टाचार केला, अवैध संपत्ती कमावली. मनोज जरांगे आणि त्यांच्या या सहकाऱ्यांच्या या काळ्या धंद्याच्या विरोधात मी प्रवर्तन निदेशालय म्हणजेच ईडीकडे अधिकृतरित्या तक्रार केलेली आहे.

मला ईडी कार्यालयाकडून बोलावणं आलं होतं. मी ईडी कार्यालयात जाऊन डेप्युटी डायरेक्टर यांच्याकडे मी माझी सगळी बाजू मांडली. त्यांच्याशी संबंधित काही माझ्याकडे उपलब्ध पुरावे होते ते सगळे मी दिले आणि त्यांना विनंती केली, मराठा समाजाच्या आरक्षणाच्या नावाखाली मनोज जरांगे याचे जे काही सहकारी आहेत, पांडुरंग तारक, ईश्वर बलांडे, गंगाधर काळकुटे, श्रीराम पुरणकर, संजय कटारे, स्वप्नील तारक, बद्रीनाथ तारक आणि त्याचा मेहुणा विलास खेडकर आणि इतर अनेक नावं आहेत. वाळूचा माफिया हा सगळ्यात मोठा त्यांचा धंदा आहे आणि ईडीकडे वाळूच्या धंद्याच्या बाबतीमध्ये कारवाई करण्याचे अधिकार आहेत. त्यांनी जो काही प्रचंड करोडो रुपयांचा, कल्पनाही करता येणार नाही, कमीत कमी हजार एक कोटी रुपयांचा भ्रष्टाचार या ठिकाणी केलेला आहे, याची सगळी चौकशी करण्यात यावी. त्याबाबत गुन्हा दाखल करण्यात यावा, जो ईडीकडे आहे.

या सर्व लोकांना, गंगाधर काळकुटे असेल, तारक असतील जे काही सगळे माणसं आहेत, त्यांना चौकशीसाठी बोलवावं, त्यांच्या सगळ्यांच्या संपत्तीची चौकशी करावी. डिफेंडर गाड्या कुठून आल्या? लीलावती हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी पैसे कुठून येतात? पांडुरंग तारकने ५० एकर जमीन घेतली, २८ एकर जमीन घेतली या सर्व विषयांसाठी आम्ही ईडीच्या ऑफिसमध्ये आलेलो आहोत", अशी माहित देखील अजय बारसकर यांनी दिली आहे.

## ज्या मातेच्या कुशीतून जन्मलो, त्या संस्काराचे वर्तन ठेवा, ज्योती मेटेंचा मनोज जरांगेंना सल्ला

बीड दि.१० (प्रतिनिधी)- मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज १२ वा दिवस असून सरकारने आपल्या मागण्या मान्य न केल्यामुळे आपले उपोषण सुरूच राहणार असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले. एकीकडे सरकारकडून जरांगे पाटलांनी आपलं उपोषण मागे घ्यावे, असे आवाहन सातत्याने केलं जात आहे. मात्र, जोपर्यंत सर्वच मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याची भूमिका पाटलांनी घेतली आहे. तर, १२ तारखेला मुंबईला जाणारच या मागणीवर ठाम असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेवर शिवसंग्राम पक्षाच्या नेत्या तथा दिवंगत विनायक मेटे यांच्या पत्नी डॉ. ज्योती मेटे यांनी पत्रकार परिषद घेत स्पष्ट मत व्यक्त केले.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनातील १५ मागण्यांच्या बाबत तपशिलाने विचार केला तर यातील बारा मागण्या पूर्ण झाल्याचे मला दिसते. त्याबरोबरच शासनाने चर्चेची सर्व दारे खुली ठेवलेली आहेत. आपण जेव्हा आंदोलनाचे नेतृत्व करतो तेव्हा त्या आंदोलनाची यशस्वी अथवा अयशस्वी, जी काही असेल ती सांगता होणे गरजेचे असते. जरांगे पाटील यांनी प्रत्येक मागणीचा तपशिलाने विचार करावा आणि मगच काय तो निर्णय घ्यावा, असे ज्योती मेटे यांनी म्हटले आहे. युद्धात कमावलं आणि तहात गमावलं असं व्हायला नको, असेही त्यांनी स्पष्टपणे म्हटले.

जरांगे पाटील यांच्या शिवराळ भाषेबाबतही ज्योती मेटे यांनी वक्तव्य केले, गावगाडा चालला पाहिजे, जातीय सलोखा कायम राहिला पाहिजे या मताची मी आहे. आम्ही जेव्हा नेतृत्व करतो तेव्हा आमच्यावर जबाबदारी असते. आमचं वर्तन जसे असेल तसंच अनुयायांचे देखील असते. ज्या मातेच्या कुशीतून आपण जन्म घेतो तिचे संस्कार सार्थ ठरतील असेच वर्तन आपलं असलं पाहिजे, असेही त्यांनी म्हटले.

## जशी प्रवृत्ती, तशी माझी भाषा वापरावी लागते-मनोज जरांगे

जालना दि.१० (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसलेले आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज १३ वा दिवस आहे. सलग १३ दिवसांपासून सुरू असलेल्या अन्नत्यागामुळे त्यांची प्रकृती खालावली आहे. काल तब्येत बिघडल्यामुळे त्यांना सलाईन लावण्यात आले होते.

दरम्यान आज माध्यमांशी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, जशी प्रवृत्ती असेल, तशीच भाषा वापरावी लागते. एकनाथ शिंदेंवर बोलावं लागतं याचं मलाही दुःख होतं; पण संजय शिरसाट यांच्यामुळे बोलावे लागते आहे, शिंदेंच्या लोकांनी त्यांना बोलावे की



तुमच्यामुळे जरांगे पाटील विरोधात बोलत आहे. गेली ३ वर्षे त्यांना माझी भाषा चांगली वाटत होती का? असा सवाल सुद्धा मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. दरम्यान, १२ तारखेला अंतरवाली सराटी येथे एक महत्त्वाची राज्यव्यापी बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत मुंबईतील आंदोलनाची पुढील दिशा आणि स्वरूप जाहीर केले जाईल.

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले, बहिणीने जेवायला बोलावले आहे; तर भाऊबीजेला नक्कीच बहिणीकडे जेवायला जाऊ. पण आता आंदोलन सुरू आहे, त्यामुळे त्यांनी आता बोलावू नये. भाऊ संकटात पडेल असे बहिणीने करू नये. भाऊबीजेला साडीचोळी घेऊन जाऊ. त्यांनी चांगल्या भावनेने बोलावले आहे, त्यामुळे उगाच चुकीचा अर्थ काढण्याला किंवा आडवे जाण्याला काही अर्थ नाही. भावाचे नाते जोडले आहे, तर भाऊबीजेला त्यांच्याकडे जेवायला जाऊ, असे अमृता फडणवीस यांच्या जेवनाला येण्याच्या निमंत्रणावर बोलताना जरांगे पाटलांनी म्हटले आहे.

## चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग ब्रिक्स शिखर परिषदेसाठी भारतात येणार

नवी दिल्ली दि.१० (वृत्तसंस्था)- चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी नवी दिल्लीला येणार आहेत. चीनने देखील या वृत्ताला अधिकृत दुजोरा दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणानंतर राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग १२ ते १३ सप्टेंबर दरम्यान नवी दिल्ली येथे होणाऱ्या १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेला उपस्थित राहतील, असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

२०२० मधील गलवान खोऱ्यात झालेल्या चकमकींनंतर दोन्ही देशांमधील संबंध ताणले होते. या चकमकीत २० भारतीय सैनिक आणि काही चिनी सैनिक मारले गेले होते. त्यानंतर क्षी जिनपिंग यांचा गेल्या सात वर्षांतील पहिलाच भारत दौरा ठरणार आहे. २०१९ मध्ये जिनपिंग यांनी चेन्नईजवळील महाबलीपुरम येथे पंतप्रधान मोदींबरोबर एका परिषदेसाठी भारताचा दौरा केला होता. त्याआधी सप्टेंबर २०१४ मध्ये शी जिनपिंग पहिल्यांदा भारतात आले होते. यानंतर २०१६ मध्ये ब्रिक्स शिखर परिषदेसाठी त्यांनी गोव्यात हजेरी लावली होती.

दरम्यान, गेल्या काही वर्षात भारत आणि चीनमधील संबंधांमध्ये सुधारणा झाली आहे. गेल्या वर्षी पंतप्रधान मोदींनी चीनला भेट दिली होती. २०२० च्या चकमकींनंतर (पान ४ वर)

## उत्सवखोरांचे वाघ सिंह झालेत, त्यांचे दात आणि नखं उपटायची आहेत; विद्यानंद बापट यांचे वक्तव्य

पुणे दि.१० (प्रतिनिधी)- डी.जे. आणि लाऊड स्पीकरवर बंदी घाला अशी आग्रही मागणी लावून धरणारे विद्यानंद बापट हे मागच्या दोन ते तीन आठवड्यांपासून चांगलेच चर्चेत आहेत. मागच्या आठवड्यात त्यांना पुण्यात याच मुद्द्यावर बोलत असताना मारहाण झाली. त्याचा निषेधही करण्यात आला, पण विद्यानंद बापट यांनी त्यांचा निश्चय सोडलेला नाही. उत्सवखोरांचे वाघ सिंह झाले आहेत त्यांचे दात आणि नखं आम्हाला उपटायची आहेत असं वक्तव्य आता विद्यानंद बापट यांनी केलं आहे.

"ध्वनी प्रदूषण आणि रहदारीस अडथळा या मानवनिर्मित गोष्टी आहेत. त्यावर १०० टक्के नियंत्रण आणलं जाऊ शकतं. करोना काळात हे आपण सगळ्यांनी पाहिलं आहे. संस्कृती, परंपरा असं सांगत असले तरीही मी मानवनिर्मित समस्यांबाबतच बोलतो आहे. कारण त्यात कितीही बदल शक्य आहेत. आम्ही एवढ्याच बदलांचा आग्रह धरतोय जेणेकरून ते निरुपद्रवी बनतील. उत्सवखोरांचे जे वाघ-सिंह झालेत ना, ते आम्हाला ठार मारायचे नाही. म्हणजे आम्हाला पूर्ण उत्सव बंद करायचा आहे असं नाही. पण आम्हाला त्यांचे दात तरी पाडून टाकायचे आहेत. नखं तरी उपटून काढायची आहेत. मग ते टेक्निकली वाघ-सिंह म्हणून जिवंत आहेत याला काही अर्थ राहात नाही. उत्सवखोरांचे जे वाघ सिंह यांची तीक्ष्ण दात आणि तीक्ष्ण नखं, म्हणजेच ध्वनी प्रदूषण आणि रहदारीस अडथळा हे आम्हाला संपवायचं आहे. त्यानंतर त्यांनी ३६५ दिवस उत्सव साजरा करुदेत. आम्हीच त्यांना थँक्स गिव्हिंग, हॅलोविन, टोमॅटो फेस्टिव्हल असे उत्सव शोधून देऊ. आमचा काही विरोध नाही." असं विद्यानंद बापट यांनी म्हटलं आहे. मुंबई तक या युट्यूब चॅनलला विद्यानंद बापट यांनी हे विधान केलं आहे.

अवजड वाहनं शहराच्या बाहेरून गेली तर शहरातल्या रहदारीवर परिणाम होत नाही. त्यामुळे मानाचे गणपतीही पुण्याच्या बाहेर नेले पाहिजेत म्हणजे ध्वनी प्रदूषण होणार नाही किंवा रहदारीस अडथळा होणार नाही. वारीमध्येही बदल करता येऊ शकतात. तुमचा आनंद म्हणजे इतर लोकांना त्याचा त्रास होता कामा नये असं मला वाटतं असंही सदानंद बापट यांनी म्हटलं आहे. तुमचा आनंद इतर लोकांसाठी त्रासदायक होणार नाही असा समाज निर्माण झाला (पान ४ वर)

## कुख्यात अबू सालेमची मुदतपूर्व सुटकेची मागणी सुप्रीम कोर्टाने फेटाळली

नवी दिल्ली दि.१० (वृत्तसंस्था)- १९९३ च्या मुंबई साखळी बॉम्बस्फोट आणि बांधकाम व्यावसायिक प्रदीप जैन यांच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या गँगस्टर अबू सालेम संदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. १९९३ बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी आणि गैंगस्टर अबू सालेमला सुप्रीम कोर्टानं मोठा झटका दिलाय. १९९३ मुंबई बॉम्बस्फोटातील दोषी अबू सालेमची २५ वर्षांचा कारावास पूर्ण झाल्याच्या आधारावर सुटकेची मागणी करणारी याचिका कोर्टाने फेटाळली आहे.

दरम्यान, २००५ मध्ये पोर्तुगालमधून भारतात आणताना २५ वर्षांपेक्षा अधिक कारावास न देण्याचे भारत सरकारने आश्वासन दिले होते. अंडरट्रायल काळ, दोषसिद्धीनंतरचा कारावास आणि चांगल्या वर्तणुकीची रिमिशन मोजल्यास ३१ मार्च २०२५ रोजी २५ वर्षे पूर्ण झाल्याचा सालेमचा दावा होता. तर २०२२ मध्ये सुप्रीम कोर्टाने २५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर केंद्राने लवकर सुटकेची प्रक्रिया सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, पोर्तुगालमधील पासपोर्ट फसवणूक प्रकरणातील कारावासाचा कालावधी २५ वर्षांत मोजता येणार नसल्याचे कोर्टाने स्पष्ट केले होते. परिणामी बॉम्बे हायकोर्टानंतर सुप्रीम कोर्टानेही आज सालेमच्या सुटकेच्या मागणीला नकार दिला असून सुटका करण्याची गँगस्टर अबू सालेमची मागणी कोर्टाने फेटाळून लावत मोठा झटका दिला आहे.

## 'मि. सिंग आमच्या देशातून निघून जा', ट्रम्प प्रशासनाची भारतीयांविरोधात वंशद्वेषी जाहिरात

वॉशिंग्टन दि.१० (वृत्तसंस्था)- अमेरिकेच्या गृह सुरक्षा विभागाने (होमलँड सिक्युरिटी) सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या एका जाहिरातीमुळे वाद निर्माण झाला आहे. स्वतः देशातून निघून जा किंवा परिणाम भोगायला तयार व्हा, असा संदेश या जाहिरातीमधून भारतीयांना देण्यात आला आहे. या जाहिरातीवर आता टीका होत असून अनेकांनी याला वंशवादी आणि भारत विरोधी म्हटले आहे. एआयच्या मदतीने तयार केलेली ही पोस्ट होमलँड सिक्युरिटीच्या अधिकृत हँडलवर शेअर करण्यात आली आहे. ट्रम्प प्रशासनाने गेल्या काही काळापासून स्थलांतरितांविरोधात सुरू केलेल्या आक्रमक कारवाईचा प्रत्यय यातून येत आहे.

हॉलिवूडच्या ट्रान्सफॉर्मर्स या चित्रपटातील 'ऑप्टिमस प्राइम' या रोबोटिक पात्राचा वापर करून सदर जाहिरात तयार करण्यात आली आहे. ज्यामध्ये दाढी असलेल्या एका भारतीय चेहरेपट्टीच्या व्यक्तीला 'मि. सिंग' असे संबोधून अमेरिकेतून निघून जाण्याची धमकी देण्यात आली आहे. "स्वतःहून निघून जा, नाहीतर परिणाम भोगण्यासाठी तयार व्हा", असा इशारा ऑप्टिमस प्राइम देतो.

या पोस्टमध्ये फोटोखाली एक संदेशही लिहिला आहे. "आमच्या रस्त्यांवरून चालते व्हा. मि. सिंग गाडी कशी चालवायची हे तुम्हाला कळत नाही", भारतीय आणि शीख आडनाव वापरून तयार केलेल्या या पोस्टमुळे आता नवा वाद निर्माण झाला आहे.

होमलँड सिक्युरिटीने गेल्या काही काळापासून अवैध स्थलांतरित आणि स्थलांतरित ट्रक चालकांविरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून सदर पोस्ट केल्याचे सांगितले जाते. याचबरोबर एक व्हिडीओही पोस्ट केला गेला आहे. ज्यात ट्रान्सफॉर्मर्स सिनेमातील खलनायक मेगाट्रॉन दाखवला गेला आहे. व्हिडीओमधील हा मेगाट्रॉन रस्ते अपघात आणि इतर गुन्ह्यांसाठी अटकेत असलेले चालक हरजिंदर सिंग, राजिंदर कुमार, जसवीर सिंग आणि इतरांची सुटका करण्याची मागणी करतो.

## मुंढवा जमीन गैरव्यवहार; हायकोर्टाच्या सवालानंतर पार्थ पवारांसह राज्य सरकारवर अंजली दमानियांची टीका

पुणे दि.१० (प्रतिनिधी)- पुण्यातील मुंढवा येथील कथित सरकारी जमीन गैरव्यवहार प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. या प्रकरणाच्या तपासात एकाच कंपनीचे दोन संचालक असल्याचे समोर आल्यानंतर त्यापैकी एका संचालकाला आरोपी करण्यात आले, मात्र खासदार पार्थ पवार यांना आरोपी का करण्यात आले नाही, असा थेट सवाल मुंबई उच्च न्यायालयाने राज्य पोलिसांना केला आहे. न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकलपीठाने या प्रकरणात महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालकांना वैयक्तिक प्रतिज्ञापत्र दाखल करून स्पष्टीकरण देण्याचे निर्देश दिले आहेत. प्रकरणाची पुढील सुनावणी २८ सप्टेंबर रोजी होणार आहे.

दरम्यान, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी याच मुद्द्यावरून एक व्हिडीओ शेअर करत राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. खारगे समितीच्या अहवालात पार्थ पवारांचे नाव चार वेळा आल्याचा दावा करत, त्यांचे नाव एफआयआरमध्ये का नाही, याचे उत्तर सरकारने द्यावे, अशी मागणी दमानिया यांनी केली आहे. मात्र, हा त्यांचा दावा असून त्याची स्वतंत्र न्यायालयीन पुष्टी झालेली नाही.

मुंढवा जमीन प्रकरणात पुण्याचे तहसीलदार सूर्यकांत गुलाबराव येवले (पान ४ वर)

## आता फक्त राष्ट्रपती भवन गुजरातला नेणे बाकी; आदित्य ठाकरेंची केंद्रावर सडकून टीका

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा दिल्लीऐवजी गुजरातमधील केवडिया येथे आयोजित करण्याच्या निर्णयावरून राजकीय वातावरण तापले असतानाच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. "केंद्र सरकार गुजरातचे आहे की संपूर्ण देशाचे?" असा थेट सवाल करत त्यांनी राष्ट्रीय पुरस्कार, मोठे क्रीडा कार्यक्रम, उद्योग आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रकल्प गुजरातकडे वळवले जात असल्याचा आरोप केला. एवढेच नव्हे तर, "आता फक्त राष्ट्रपती भवन गुजरातला नेणे बाकी आहे," असा खोचक टोला त्यांनी लगावला.

मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत आदित्य ठाकरे यांनी विविध मुद्द्यांवर सरकारला घेरले. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचा सोहळा गुजरातला नेण्याच्या निर्णयावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही तीव्र प्रतिक्रिया दिल्याचा संदर्भ देत आदित्य यांनी कलाकारांनी आणि महाराष्ट्रासह दक्षिणेकडील राज्यांनी या निर्णयाविरोधात भूमिका घ्यावी, असे म्हटले. यासोबतच एमपीएससी परीक्षेतील कथित गैरप्रकार, विद्यार्थ्यांची आंदोलने, आत्महत्येची घटना, शाळांमधील कांदा-लसूण बंदीचा वाद, मुंबई महापालिकेतील कथित आयटी घोटाळा, सुधार समितीतील भूखंडांचे प्रस्ताव आणि महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला जात असल्याच्या मुद्द्यावर त्यांनी सरकारवर टीका केली.

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचा सोहळा यंदा प्रथमच दिल्लीबाहेर गुजरातमधील केवडिया येथे आयोजित केला जात आहे. या निर्णयावर बोलताना आदित्य ठाकरे यांनी केंद्र सरकारच्या धोरणावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राष्ट्रीय पुरस्कार गुजरातला, ऑलिम्पिकशी संबंधित उपक्रम, कॉमनवेल्थ आणि क्रिकेट विश्वचषकाच्या अंतिम सामन्यासारखे मोठे कार्यक्रम गुजरातमध्ये, तसेच विविध (पान ४ वर)

# राष्ट्रसंत आचार्य विनोबा भावे तुरुंग, ग्रंथ आणि भूदान यज्ञाची अजरामर गाथा

११ सप्टेंबर १८९५ रोजी रायगड जिल्ह्यातील गागोदे या छोट्याशा गावात विनायक नरहर भावे यांचा जन्म झाला. पुढे हेच विनायक, महात्मा गांधींचे परमशिष्य, भारताचे पहिले सत्याग्रही आणि भूदानाचे प्रणेते आचार्य विनोबा भावे म्हणून जगभरात प्रसिद्ध झाले. गांधीजींनी स्वतः म्हटले होते 'माझ्या आश्रमात असे दोनच लोक आहेत ज्यांच्याकडून मला शिकायला मिळते, एक म्हणजे मगनलाल गांधी आणि दुसरे विनोबा.' इतका मोठा गौरव मिळालेले विनोबा हेच खऱ्या अर्थाने गांधी विचारांचे वारसदार होते.

१. तुरुंगवास – तुरुंग हाच तपोवन, विनोबांचे आयुष्य हे तुरुंग आणि लेखन यांनी घडले. स्वातंत्र्य लढ्यात त्यांना एकूण ५ वेळा तुरुंगवास घडला. पहिला तुरुंगवास (१९२१) : नागपूरचा झेंडा सत्याग्रह. विनोबांनी पहिल्यांदा तुरुंग पाहिला.

दुसरा आणि ऐतिहासिक तुरुंगवास (१९४०) : दुसऱ्या

महायुद्धात गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला, तेव्हा पहिला सत्याग्रही म्हणून विनोबा भावेंची निवड केली. पवनार आश्रमातून ते निघाले आणि त्यांना अटक झाली. याच तुरुंगवासाने त्यांना राष्ट्रीय नेता बनवले.

धुळे आणि नागपूरच्या तुरुंगात – गीतेचा जन्म: १९३२ आणि १९४० मध्ये धुळ्याच्या तुरुंगात असताना विनोबांनी कैद्यांसाठी दर रविवारी गीतेवर प्रवचने दिली. हीच प्रवचने पुढे 'गीताई' आणि 'गीता प्रवचने' या जगप्रसिद्ध ग्रंथाच्या रूपाने प्रसिद्ध झाली. तुरुंग हे त्यांच्यासाठी विद्यापीठ होते. एकूण सुमारे ५ वर्षे ते ब्रिटिश तुरुंगात होते, पण एकदाही त्यांनी माफी मागितली नाही.



२. लेखन – एका ऋषीची साहित्य संपदा – विनोबा हे केवळ कर्मयोगी नव्हते, तर प्रचंड साहित्यिक होते. त्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत या भाषांमध्ये लेखन केले.

अ) गीता प्रवचने आणि गीताई : हा त्यांचा सर्वात मोठा

ग्रंथ. धुळ्याच्या तुरुंगात दिलेली १८ प्रवचने. गांधीजी म्हणाले होते – 'ही गीता टीका हृदयातून निघाली आहे.' गीताई म्हणजे गीतेचा समश्लोकी मराठी अनुवाद, जो आजही लाखो लोकांच्या नित्यपठणात आहे.

ब) इतर महत्त्वाचे ग्रंथ :

स्वराज्य शास्त्र : स्वातंत्र्य आणि राज्यव्यवस्थेवरील विचार.

लोकनागरी : नागरी लिपी सुधारणेवरील ग्रंथ.

ईशावास्योपनिषद, स्थितप्रज्ञ दर्शन

भूदान यज्ञ, त्रयी – भूदान चळवळीवरील विचार

त्यांनी कुराण, बायबल, गुरुग्रंथ साहिब यांचाही अभ्यास करून त्यावर भाष्ये लिहिली. त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता.

३. भूदान चळवळ – रक्तहीन क्रांती

स्वातंत्र्यानंतर विनोबांना दिसले की गोरे इंग्रज गेले, पण काळी गरिबी तशीच आहे. जमीन हीच या गरिबीचे मूळ आहे.

पोचमपल्ली येथे क्रांतीचा जन्म १८ एप्रिल १९५१ :

विनोबा तेलंगणातील पोचमपल्ली या नक्षलवादी भागात गेले. तिथे हरिजन बांधवांनी त्यांना सांगितले – 'आम्हाला सरकारकडून नाही, पण तुमच्याकडून ८० एकर जमीन हवी, आम्ही कष्ट करू.' त्याच सभेत जमीनदार रामचंद्र रेड्डी यांनी पुढे येऊन १०० एकर जमीन दान दिली. विनोबा म्हणाले –'हा देवाने दिलेला संकेत आहे.'

त्या दिवसापासून त्यांनी भूदान यज्ञ सुरू केला. ते म्हणाले –'मी जमीन मागत नाही, मी तुमच्यातील प्रेम आणि करुणा मागत आहे.'

पायी भारत यात्रा : पुढील १३ वर्षे विनोबा अखंड पायी

चालले. सुमारे ७०,००० किमी अंतर. ५० लाख एकरपेक्षा जास्त जमीन त्यांना दान म्हणून मिळाली. बिहारमध्ये तर त्यांना सर्वाधिक जमीन मिळाली, म्हणून जयप्रकाश नारायण यांनी त्यांना 'बिहारचा संत' म्हटले.


पुढे त्यांनी ग्रामदान ही संकल्पना मांडली – संपूर्ण गावानेच आपली जमीन गावाच्या नावावर करावी. यातून मालकी हक्कच संपेल. ही जगाच्या इतिहासातील सर्वात मोठी अहिंसक आणि रक्तहीन जमीन क्रांती होती. विनोबांनी सिद्ध केले की बंदुकीशिवायही सामाजिक बदल घडू शकतो.

आजच्या काळात विनोबांचे महत्त्व – आज २०२६ मध्ये जेव्हा आपण छत्रपती संभाजीनगरमध्ये जमिनीच्या वादावरून होणाऱ्या भांडणं पाहतो, तेव्हा विनोबांचा विचार आठवतो – जमीन ही बाजारातील वस्तू नाही, ती आई आहे. १५ नोव्हेंबर १९८२ रोजी पवनार येथे त्यांनी अन्न-पाणी त्याग करून देह ठेवला. त्यांना मरणोत्तर भारतरत्न मिळाला. ११ सप्टेंबरला त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करताना आपण एकच संकल्प करूया – तुरुंगातही ग्रंथ लिहिणारी विद्वत्ता, पायी चालून जमीन मागणारी नम्रता आणि शत्रूचेही हृदयपरिवर्तन करणारी अहिंसा – हाच खरा विनोबा विचार आपण जपूया.

**– डॉ. अभय मंडलिक**

## 'जिवा शिवाची बैल जोड...'; महाराष्ट्राच्या मातीत रुजलेलं बळीराजा-बैलांचं अतूट नातं लवकरच पडद्यावर!

मुंबई : 'जिवा शिवाची बैल जोड, लाविल पैजंला आपली कुडं...'चं महत्व सांगणाऱ्या महाराष्ट्राच्या मातीत रुजलेलं हे बळीराजा आणि बैलांचं नातं आपण पिढ्यानपिढ्या ऐकत आणि अनुभवत आलो आहोत. शेतकऱ्याच्या कष्टात खांद्याला खांदा लावून साथ देणाऱ्या बैलजोडीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साजरा होणारा पोळा सण याच भावनेने पुन्हा एकदा खास ठरला आहे. कारण पोळ्याच्या मुहूर्तावर एका नव्या मराठी चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे.शेतकरी आणि बैल यांच्यातील जिव्हाळा, मातीशी जोडलेलं नातं आणि कष्टाच्या वाटेवरची सोबत आता मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. याच भावनिक नात्याची हृदयस्पर्शी कहाणी घेऊन 'जोडी' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'काळाने कितीही घाव घातले, तरी हे नातं तुटत नसतं!' या टॅगलाइनमधून चित्रपटाच्या कथानकाची भावनिक झलक पाहायला मिळते. पोळ्याच्या निमित्ताने झालेली 'जोडी'ची घोषणा त्यामुळेच विशेष ठरत असून, या चित्रपटातून शेतकरी आणि बैलजोडीच्या अतूट नात्याची गोष्ट रुपेरी पडद्यावर उलगडणार आहे.




# राज्यात वाढती गुन्हेगारी : कायदा कडक हवा, पण समाजही जागा हवा!

## सुरक्षिततेचा हक्क प्रत्येक नागरिकाचा, आता ठोस पावले उचलण्याची वेळ

**महाराष्ट्र** हे प्रगत, औद्योगिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध राज्य म्हणून ओळखले जाते. मुंबईसारखे जागतिक शहर, पुण्यासारखे शिक्षणाचे केंद्र, नागपूरसारखे वेगाने विकसित होणारे शहर आणि असंख्य गावे-मोठी शहरे असा विविधतेने नटलेला हा प्रदेश. मात्र, या प्रगतीच्या चित्राला वाढती गुन्हेगारी काळा डाग लावत आहे. खून, दरोडे, लूटमार, महिलांवरील अत्याचार, बालगुन्हेगारी, सायबर फसवणूक, अमली पदार्थांचा वाढता विळखा, घरफोड्या आणि आर्थिक गुन्हे यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होत असेल, तर ही बाब केवळ पोलिसांची नव्हे, तर संपूर्ण समाजाची चिंता आहे. गुन्हा घडल्यानंतर आरोपी पकडणे महत्त्वाचेच, पण गुन्हा घडण्यापूर्वी त्याला रोखणे ही खरी कसोटी आहे.

गुन्हेगारी ही अचानक निर्माण होत नाही. तिच्यामागे अनेक सामाजिक, आर्थिक आणि मानसिक कारणांची गुंतागुंत असते. बेरोजगारी, व्यसनाधीनता, आर्थिक विषमता, कौटुंबिक कलह, बालकांकडे होणारे दुर्लक्ष, शिक्षणातील गळती, चुकीची संगत आणि गुन्हेगारी प्रवृत्तीचे उदात्तीकरण ही काही कारणे आहेत. मोबाईल आणि सोशल मीडियाने जग जवळ आणले, पण त्याचबरोबर गुन्हेगारीचे नवे मार्गही खुले केले. बनावट लिंक, जढझ फसवणूक, ऑनलाइन बँकिंग घोटाळे, बनावट गुंतवणूक योजना, सोशल मीडिया ब्लॅकमेलिंग आणि डिजिटल ओळख चोरी यामुळे सामान्य नागरिकांपासून ज्येष्ठांपर्यंत अनेक जण लक्ष्य बनत आहेत. गुन्हेगार बदलला आहे, मग गुन्हेगारी रोखण्याची यंत्रणाही बदलली पाहिजे.

महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सर्वाधिक गंभीर आहे. छेडछाड, विनयभंग, कौटुंबिक हिंसा, लैंगिक अत्याचार आणि ऑनलाइन छळाच्या घटना समाजाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. महिला रात्री सुरक्षितपणे प्रवास करू शकत नसेल, मुलगी शाळा-कॉलेजमधून परतताना पालक चिंतेत असतील, तर विकासाच्या मोठमोठ्या आकडेवारीला अर्थ उरत नाही. महिलांसाठी प्रकाशमान रस्ते, प्रभावी सीसीटीव्ही व्यवस्था, सुरक्षित सार्वजनिक वाहतूक, तत्पर हेल्पलाइन, महिला पोलिसांची उपलब्धता आणि तक्रारींचे संवेदनशीलपणे निवारण आवश्यक आहे. महिला सुरक्षेची जबाबदारी केवळ पोलिसांची नाही. घरातील संस्कारांपासून शाळेतील शिक्षणापर्यंत आणि समाजाच्या मानसिकतेपासून न्यायव्यवस्थेपर्यंत प्रत्येक घटकाला यात भूमिका बजावावी लागेल.

पूर्वी चोर घराच्या खिडकीतून येत असे, पण आज तो मोबाईलच्या पडद्यामागे बसतो! ही बदलत्या गुन्हेगारीची सर्वात मोठी शोकांतिका आहे. एखाद्या व्यक्तीचा बँक खाते क्रमांक, जढझ, पासवर्ड किंवा वैयक्तिक माहिती मिळवून काही मिनिटांत आर्थिक नुकसान केले जाते. सायबर गुन्ह्यांविरोधात केवळ पोलिसांची तांत्रिक क्षमता वाढवून चालणार नाही. डिजिटल साक्षरता ही आजच्या काळातील नागरिक सुरक्षा आहे. शाळा-महाविद्यालयांपासून ग्रामपंचायत स्तरापर्यंत सायबर सुरक्षा जनजागृती झाली पाहिजे. ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र मार्गदर्शन मोहीम राबवली पाहिजे. बँका, दूरसंचार कंपन्या आणि पोलीस यांच्यातील समन्वय अधिक वेगवान झाला पाहिजे. गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिसांचे मनुष्यबळ, आधुनिक तंत्रज्ञान, फॉरेन्सिक सुविधा, प्रशिक्षण आणि वाहनसुविधा वाढवणे अत्यावश्यक आहे. पोलिसांवर वाढणारा कामाचा ताण कमी करण्यासाठी मनुष्यबळाची उपलब्धता वाढवावी. तपासात तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावी वापर झाला पाहिजे. सीसीटीव्ही नेटवर्क, डिजिटल पुरावे, फॉरेन्सिक तपास आणि डेटा विश्लेषण यांचा समन्वय वाढवला पाहिजे. मात्र, प्रत्येक गुन्ह्याची जबाबदारी पोलिसांच्या माथी मारणे ही समाजाची सोयीस्कर पळवाट आहे. घरात मुलांवर संस्कार कोण करणार? व्यसनाच्या आहारी जाणाऱ्या तरुणाला थांबवणार कोण? गुन्हेगारीला ग्लॅमर देणाऱ्या मानसिकतेला विरोध कोण करणार? याची उत्तरे समाजानेच शोधली पाहिजेत.

गुन्हा घडतो, तपास होतो, आरोपी अटक होतो, पण न्यायालयीन प्रक्रिया वर्षानुवर्षे चालत राहिली तर कायद्याचा धाक कमी होतो. न्यायव्यवस्था स्वतंत्र आणि निष्पक्ष राहूनही प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे. गंभीर गुन्ह्यांच्या तपासात गुणवत्ता वाढवणे, साक्षीदारांचे संरक्षण करणे आणि न्यायालयीन प्रक्रियेला आवश्यक पायाभूत सुविधा देणे गरजेचे आहे. कायद्याची भीती असणे म्हणजे पोलिसांची भीती नव्हे, तर कायदा मोडल्यास शिक्षा निश्चित आहे, याचा विश्वास असणे होय.

तरुणाई ही राज्याची सर्वात मोठी ताकद आहे. पण बेरोजगारी, व्यसन, चुकीची संगत आणि सोशल मीडियावरील हिंसक किंवा गुन्हेगारी जीवनशैलीचे आकर्षण यामुळे काही तरुण चुकीच्या दिशेने जातात. यासाठी केवळ शिक्षा पुरेशी नाही. क्रीडा, कौशल्यविकास, रोजगार, व्यावसायिक प्रशिक्षण, समुपदेशन आणि सर्जनशील उपक्रमांची दारे अधिक खुली झाली पाहिजेत. एका तरुणाला रोजगार मिळाला, तर कदाचित एका गुन्ह्याला सुरुवात होण्यापासून रोखता येईल.

अनेक गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर व्यसनाचा प्रश्न दिसतो. दारू, अमली पदार्थ आणि इतर व्यसनांमुळे व्यक्तीची निर्णयक्षमता, आर्थिक स्थिती आणि कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त होऊ शकते. म्हणूनच व्यसनविरोधी कारवाई केवळ अधूनमधून होणाऱ्या छाप्यांपुरती मर्यादित न राहता पुरवठा साखळीवर कठोर कारवाई, पुनर्वसन आणि जनजागृती यांचा एकत्रित कार्यक्रम असला पाहिजे.

व्यसनाधीन व्यक्तीला गुन्हेगार म्हणून हिणवण्यापेक्षा, त्याला पुन्हा समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पुनर्वसनाची दारेही उघडी ठेवली पाहिजेत. गुन्हेगारीविरोधी लढ्याची सुरुवात पोलिस ठाण्यात नव्हे, तर घर आणि शाळेत झाली पाहिजे. मुलांना कायदा, संविधान, स्त्री-सन्मान, डिजिटल सुरक्षितता, व्यसनांचे दुष्परिणाम, संवादाचे महत्त्व आणि संघर्षाचे अहिंसक मार्ग शिकवले पाहिजेत. मुलांच्या वर्तनात अचानक बदल दिसल्यास पालकांनी त्याकडे दुर्लक्ष करू नये. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि सामाजिक अडचणींबाबत संवेदनशील राहिले पाहिजे. गुन्हेगारीविरोधी लढ्यात नागरिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. संशयास्पद हालचालींकडे दुर्लक्ष न करणे, सायबर फसवणूक झाल्यास तातडीने संबंधित यंत्रणेशी संपर्क साधणे, अफवा न पसरवणे आणि कायदा हातात न घेणे, ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. गुन्हेगाराला शिक्षा देणे न्यायव्यवस्थेचे काम आहे, जमावाने न्याय करणे हा स्वतः एक गंभीर धोका आहे. कायदा हातात घेणारा जमाव आणि कायदा मोडणारा गुन्हेगार, या दोघांमधील सीमारेषा समाजाने विसरता कामा नये.

गुन्हेगारी संपवण्याचा दावा करणे सोपे आहे, पण तिची मुळे उपटणे कठीण आहे. त्यासाठी पोलीस, प्रशासन, न्यायव्यवस्था, शैक्षणिक संस्था, कुटुंब, माध्यमे, स्वयंसेवी संस्था आणि सामान्य नागरिक या सर्वांनी एकत्र काम केले पाहिजे. गुन्हेगारांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, पण त्याचवेळी गुन्हे निर्माण करणारी सामाजिक परिस्थिती बदलली पाहिजे. कारण प्रत्येक गुन्ह्याच्या मागे एक पीडित कुटुंब असते. एका खुनामागे अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त होते. एका बलात्कारामागे एका महिलेचे नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य हादरते. एका सायबर फसवणुकीमागे एखाद्या ज्येष्ठाची आयुष्यभराची बचत संपते. म्हणून गुन्हेगारीच्या आकडेवारीकडे केवळ आकडे म्हणून पाहू नका. प्रत्येक आकड्यामागे एक माणूस आहे, एक कुटुंब आहे आणि एक वेदना आहे. महाराष्ट्राला केवळ मोठे रस्ते, उंच इमारती आणि औद्योगिक प्रगती नको, निर्भयपणे जगणारा नागरिक हवा आहे. कायद्याचा धाक, पोलिसांची कार्यक्षमता, न्यायाची गती, तरुणांना संधी आणि समाजाची संवेदनशीलता, या पाच आधारस्तंभांवरच सुरक्षित महाराष्ट्र उभा राहू शकतो. गुन्हेगाराला कायद्याची भीती आणि सामान्य माणसाला कायद्याचा विश्वास वाटला, तरच खऱ्या अर्थाने न्याय्य आणि सुरक्षित महाराष्ट्र घडेल. सुरक्षित नागरिक, सक्षम यंत्रणा आणि संवेदनशील समाज, हीच महाराष्ट्राच्या प्रगतीची खरी दिशा!

**– प्रवीण बागडे**

## 'एआय' मोड्यूलने महावितरणचा वीजचोरांवर सर्जिकल स्ट्राईक; ३ महिन्यांत २८ हजार वीजचोऱ्यांचा पर्दाफाश

छत्रपती संभाजीनगर, दि. १० (प्रतिनिधी) – वीजचोरीविरोधी तडाखा देण्याच्या मोहिमेमध्ये महावितरणने आता 'एआय'च्या 'सुपर इंटेलिजन्स'चा वापर करून वीजचोरांवर सर्जिकल स्ट्राईक सुरु केला आहे. तब्बल १९० भरारी पथकांकडून वीजजोडण्यांची तपासणी आणि 'एआय' मोड्यूलच्या सूक्ष्म विश्लेषणातून गेल्या तीन महिन्यात ६६ कोटी २८ लाख रुपयांच्या २७ हजार ९६४ वीजचोऱ्यांचा पर्दाफाश झाला आहे. आतापर्यंत वीजचोरी व तडजोड शुल्काची रक्कम न भरलेल्या २८९ प्रकरणांमध्ये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

वीजचोरीविरोधी पारंपरिक तपासणीसोबतच महावितरणने आता हायटेक मोहीम उघडली आहे. यासाठी थेट 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' व 'मशीन लर्निंग'चा वापर करून वीजचोरीचे अचूक भाकित करणारे मोड्यूल तयार केले आहे. वीजग्राहकांचा किंवा परिसरातील वीज वापराचा जुना आलेख, अचानक घटलेली किंवा वाढलेली मागणी, मीटरमधील तांत्रिक फेरफार आणि इतर ५० हून अधिक तांत्रिक निकषांचे हे मोड्यूल २४ तास सूक्ष्म विश्लेषण करत आहे. ज्या ग्राहकांच्या वीजवापरामध्ये शंकास्पद फरक आढळत आहे त्या ग्राहकांना हे 'एआय'चे मोड्यूल 'हाय-रिस्क' श्रेणीत टाकत आहे. त्यामुळे कोणत्याही तपासणीशिवाय थेट चोरी होणाऱ्या ठिकाणाची अचूक माहिती या मोड्यूलद्वारे उपलब्ध होत आहे.

'एआय'च्या 'सुपर इंटेलिजन्स'चा वापर करून वीजचोरीच्या ठिकाणांची तपासणी करण्यासाठी महावितरणचे राज्यभरात १९० हून अधिक विशेष भरारी पथके कार्यरत आहेत. वीजचोरीविरोधी धडक कारवाईत कुठेही हयगय होऊ नये यासाठी वीजजोडण्यांच्या तपासणीपासून ते वीजबिलांच्या आकारणीपर्यंत संपूर्ण प्रक्रिया 'थेफ्ट ट्रॅकिंग ॲण्ड मॉनिटरिंग सिस्टीम'द्वारे पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली आहे. यासाठी एक स्वतंत्र मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. वीजचोरीचे ठिकाण ते तपासणीचे लाईव्ह फोटो, डिजिटल पंचनामा, जागेवरच वीजपुरवठा खंडित करणे आणि दंडात्मक बिलांची वसूली करेपर्यंतची सर्व माहिती या ॲपमध्ये रिअल-टाईम अपडेट केली जात आहे. त्यामुळे कारवाईत अत्यंत पारदर्शकता आणि वेग आला आहे. गेल्या जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांत महावितरण अंतर्गत संवसु विभाग आणि सुरक्षा व अंमलबजावणी विभागाच्या नियमित व विशेष पथकांनी छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागात ५ हजार ८३, कोकण- ११ हजार ८३, नागपूर- ५ हजार ९४९ आणि पुणे प्रादेशिक विभागात ५ हजार ८४९ अशा एकूण २७ हजार ९६४ वीजचोऱ्या उघड केल्या आहेत. त्यातील २४ हजार ५०८ वीजचोऱ्यांच्या मूल्यांकनातून ६६ कोटी २८ लाख रुपयांची वीजचोरी केल्याचे स्पष्ट झाले आहे व संबंधितांना त्याचे वीजबिल देण्यात आले आहे. आतापर्यंत वीजचोरीच्या बिलांपोटी १० हजार ८१० प्रकरणांत २९ कोटी ८५ लाख रुपयांचा भरणा करण्यात आला आहे. वीजचोरीच्या संपूर्ण रकमेचा तडजोड शुल्कासह मुदतीत भरणा केला नाही तर संबंधित वीजचोरांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात येत आहे. आतापर्यंत २८९ प्रकरणांत कलम १३५ नुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. वीजचोरीच्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांपर्यंत तुरुंगवासाच्या व दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे.

श्री. लोकेश चंद्र (मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण) – 'येत्या तीन वर्षांत महावितरणची तांत्रिक व वाणिज्यिक हानी १० टक्क्यांपेक्षा कमी करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी वीजबिलांच्या थकबाकी वसूलीला प्राधान्य देत विजचोरीविरुद्ध धडक मोहीम सुरु करण्यात आली आहे. वीजचोरीचे प्रकार उघड करण्यासाठी 'एआय' मॉड्यूल विकसित करण्यात आले असून त्याद्वारे वीजचोरीविरुद्धची धडक कारवाई आणखी तीव्र व अचूक करण्यात आली आहे.'

## १००८ दीपांच्या महाआरतीने ४४ दिवसीय श्री कल्याण मंदिर महामंडल विधानाचा १३ सप्टेंबर रोजी समारोप

छत्रपती संभाजीनगर, दि. १० (प्रतिनिधी) – भगवान श्री पार्श्वनाथ स्वामी यांच्या अनुपम स्तुती व आराधनेवर आधारित ४४ दिवसीय श्री कल्याण मंदिर महामंडल विधानाचा भव्य व ऐतिहासिक समारोप रविवार, १३ सप्टेंबर २०२६ रोजी होणार आहे. श्री आचार्य गुप्तिनंदीजी गुरुदेव सभागृह, श्री हीराकाका प्रांगण परिसर येथे परमपूज्य आचार्य श्री विनम्रसागरजी गुरुदेव यांच्या पावन सत्संग-सान्निध्यात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

समारोपाच्या दिवशी सकाळी ६ वाजता श्रीजींचा पंचामृत अभिषेक होईल. त्यानंतर बृहदब शांतिधारा, सहस्रनाम जप, भगवान श्री पार्श्वनाथ व श्री नेमिनाथ भगवान पूजन, रोट-तीज पूजन, कालसर्प विधानासंबंधित धार्मिक विधी तसेच होम-हवन आदी धार्मिक कार्यक्रम विधिपूर्वक पार पडतील. यानंतर आचार्य श्री विनम्रसागरजी गुरुदेव यांचे विशेष समापन प्रवचन होणार आहे. या प्रसंगी आधारस्तंभ परिवार, कलशधारक परिवार, च्या विधानकर्ते व दानदाता परिवार तसेच सर्व यजमान परिवारांची उपस्थिती राहणार आहे.

### पाच दीक्षार्थी भैया जींची सामूहिक गोदभराई

रविवारी सकाळी ८ वाजता परमपूज्य पट्टाचार्य भगवंत आचार्य श्री विशुद्धसागरजी गुरुदेव यांच्या पावन सान्निध्यात दिल्ली येथे होणाऱ्या पाच दीक्षार्थी भैया जींच्या दीक्षेच्या निमित्ताने खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत व सकल समाजाच्या वतीने सामूहिक गोदभराई समारोह आयोजित करण्यात आला आहे. यावेळी पाचही दीक्षार्थी भैया जींचा संक्षिप्त परिचय तसेच भावपूर्ण उद्बोधन होणार आहे.

या पुण्यप्रसंगी समाजबंधूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दीक्षार्थींच्या त्यागमय जीवनप्रवासाला मंगल आशीर्वाद द्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. १००८ दीपांच्या महाआरतीने रंगणार भक्तिमय संध्या समारोपाचा मुख्य आकर्षण असलेली भगवान श्री पार्श्वनाथ स्वामींची भव्य १००८ दीपांची महाआरती सायंकाळी ७.३० वाजता होणार आहे. विशाल दीपांच्या दिव्य प्रकाशात, भक्तिमय संगीत आणि सामूहिक आराधनेतून भगवानांची अनुपम अर्चना केली जाणार आहे. प्रत्येक परिवाराच्या सहभागातून होणारी ही महाआरती आध्यात्मिकदृष्ट्या अविस्मरणीय ठरणार आहे.



यावेळी सर्व यजमान परिवारांचा फेटा बांधून सन्मान करण्यात येणार आहे. महाआरतीसाठी सर्व यजमान, कलशधारक, आधारस्तंभ परिवार, विधानकर्ते व दानदाता तसेच सकल समाजबंधूंनी सायंकाळी ७ वाजेपर्यंत सभागृह परिसरात उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. भक्ती, साधना, त्याग आणि सामूहिक धर्माराधनेचा हा महापर्व सर्व समाजासाठी विशेष आध्यात्मिक पर्व ठरणार असून, प्रत्येक परिवाराने परिवारासह सहभागी होऊन या ऐतिहासिक समारोपाचा साक्षीदार व्हावे, असे आवाहन श्री खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत, पार्श्वनाथ मंदिर, छत्रपती संभाजीनगर आणि श्री विनम्र चातुर्मास संयोजन समिती-२०२६, सकल दिगंबर जैन समाज, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमातून राज्यभर भक्तांची मोफत आरोग्य तपासणी

मुंबई, दि. १० (प्रतिनिधी) – श्रीगणेशोत्सवात भक्तांच्या आरोग्याची काळजी घेत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने राज्यभर सुमारे २० हजार मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. सार्वजनिक गणेश मंडळांच्या मंडपांपासून महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत तसेच ग्रामीण भागापर्यंत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमाचे हे दुसरे वर्ष आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने सार्वजनिक आरोग्य विभाग सुमारे १० हजार सार्वजनिक गणेश मंडळे, शासकीय व निमशासकीय यंत्रणा, सामाजिक संस्था आणि दात्यांच्या सहभागातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यंदा राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यात आली असून नागरिकांना त्यांच्या परिसरातच मोफत आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**डॉक्टर आपल्या दारी–** या उपक्रमात नागरिकांना त्यांच्या परिसरात आरोग्य तपासणीची सुविधा मिळावी आणि आजारांचे वेळेत निदान व्हावे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. तपासणीदरम्यान आरोग्यविषयक समस्या आढळल्यास संबंधितांना पुढील तपासणी व उपचारासाठी संदर्भित करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, शहरी आरोग्य आयुक्तालय, स्थानिक स्वराज्य संस्थांची आरोग्य यंत्रणा तसेच धर्मादाय रुग्णालयांतील डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात येणार आहे. तपासणीनंतर पुढील उपचारांची आवश्यकता असलेल्या पात्र रुग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजना तसेच इतर संबंधित शासकीय योजनांच्या माध्यमातून उपचाराचा लाभ मिळवून देण्यात येणार आहे.

गेल्यावर्षी दि. २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबरदरम्यान आयोजित १२ हजार ६५५ आरोग्य शिबिरांमध्ये ७ लाख ४ हजार ७३ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी १८ हजार ८०० रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले होते. तसेच २३६ रक्तदान शिबिरांमध्ये १६ हजार ७९८ नागरिकांनी रक्तदान केले होते. या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर यंदा उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यात आली आहे.

### या आजारांचा असणार समावेश

हृदयरोग, किडनीविकार, कर्करोग, मधुमेह, संसर्गजन्य आजार, मेंदूचे गंभीर आजार, बालरोग यांसह विविध आजारांची प्राथमिक तपासणी करण्यात येणार आहे. गरजेनुसार पुढील तपासणी व उपचारासाठी रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टर तसेच संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेला 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रम यंदा अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येत आहे. नागरिकांना त्यांच्या परिसरातच मोफत आरोग्य तपासणीची सुविधा मिळणार आहे. आजारांचे वेळेत निदान होऊन गरज असलेल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी योग्य ठिकाणी संदर्भित करण्यात येणार आहे. यंदा २० लाखांहून अधिक नागरिकांच्या आरोग्य तपासणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. नागरिकांनी या उपक्रमाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# पत्रकार डॉ. जयपाल पाटील 'जीवनदूत' पुरस्काराने सन्मानित



पुणे दि. १० (प्रतिनिधी) - आपत्ती व्यवस्थापन आणि रस्ते सुरक्षा विषयक तज्ज्ञ तसेच ज्येष्ठ पत्रकार डॉ. जयपाल पाटील यांना रायगड पोलिसांच्या रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत 'जीवनदूत' या पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले.

रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांच्याहस्ते जयपाल पाटील यांचा जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलिस अधीक्षक आँचल दलाल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अप्पर पोलिस अधीक्षक अभिजित शिवथरे, उपनगराध्यक्षा मानसी म्हात्रे, रिलायन्स ग्रुपचे शशांक गोयल यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार देण्यात आला.

डॉ. जयपाल पाटील यांनी आतापर्यंत देशभरात 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' याबाबत सातशेहून अधिक सुरक्षा विषयक शाळा, महाविद्यालय, पोलीस डिपार्टमेंट आदि ठिकाणी व्याख्याने दिली असून, जागतिक आपत्ती परिषदेमध्येही आपला सहभाग नोंदविलेला आहे.

# एकीकडे गणेशोत्सवात पथकर सवलत, तर दुसरीकडे खाजगी बस प्रवासी वाऱ्यावर!

## खाजगी ट्रॅव्हल्सची ४००% ते १२००% बेकायदेशीर भाडेवाढ रोखण्यासाठी 'डिजिटल फेयर लॉक' आणि 'तक्रार QR कोड' अनिवार्य करा - सुराज्य अभियान

मुंबई, दि. १० (प्रतिनिधी) - महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी पथकर (टोल) सवलत लागू केली आहे. परंतु, शासनाकडून एकीकडे टोल सवलतीची घोषणा होत असताना, दुसरीकडे म त्र खाजगी बसेसने प्रवास करणाऱ्या हजारो चाकरमान्यांना प्रशासनाने पूर्णपणे वाऱ्यावर सोडल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. सुराज्य अभियानाने यापूर्वीही अनेकदा विविध माध्यमांतून प्रशासनाचे लक्ष वेधून कडक कारवाईची मागणी केली होती; मात्र प्रशासकीय दुर्लक्षामुळे आज ही परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या सर्व नियमित व विशेष रेल्वे गाड्यांचे आरक्षण महिनाभरापूर्वीच पूर्ण झाले आहे. तसेच एसटी महामंडळाच्या बसेसची संख्या व प्रवासी क्षमता मर्यादित असल्याने मोठ्या प्रमाणावर प्रवाशांना नाईलाजाने खाजगी कंत्राटी बसेसचा पर्याय निवडावा लागत आहे. याच परिस्थितीचा थेट गैरफायदा ऑनलाइन बस तिकीट बुकिंग एपच्या माध्यमातून खाजगी ट्रॅव्हल्स घेत असून ४००% ते १२००% पर्यंत बेकायदेशीर भाडेवाढ करत आहेत. रेड बस तिकीट बुकिंग पोर्टल वर मुंबई, पुणे आणि कोल्हापूरवरून कोकणात जाणाऱ्या सर्वच प्रमुख मार्गांवर रु. १,२०० ते रु. ३,९५७ पर्यंतची बेकायदेशीर दरवाढ दिसत आहे : पुणे ते कणकवली मार्ग: १० सप्टेंबरचे भाडे रु. २,२१७ ते रु. २,५९९ - गणेशोत्सव आगमनाच्या दिवशी (११ सप्टें) ते थेट रु. ३,४०० ते रु. ४,४२१ पर्यंत (रु. १,८०० ची वाढ) वाढवण्यात आले आहे. मुंबई (सायन) ते सिंधुदुर्ग मार्ग: ९ सप्टेंबरचे मूळ भाडे रु. १,१०० असताना, ११ सप्टेंबर रोजी रु. ४,२७६ आकारले जात आहे (रु. ३,१७६ ची थेट वाढ).

कोल्हापूर ते कांकवली मार्ग: ९ सप्टेंबरचे मूळ भाडे रु. ३६० वरून ११ सप्टेंबरसाठी थेट रु. ४,३१७ प्रति सीट (रु. ३,९५७ ची प्रचंड वाढ) आकारले जात आहे. मोटार वाहन कायदा (कलम ६७) नुसार खाजगी बसेसचे कमाल भाडे एसटीच्या मूळ भाड्याच्या १.५ पट (५०% अधिक) असणे बंधनकारक असताना ऑनलाइन मात्र अवाढव्य दराने तिकीट विक्री सुरू आहे. यासाठी परिवहन विभागाने कलम ९३ अन्वये ऑनलाईन ॲप्सवर १.५ पट मर्यादेचे 'डिजिटल फेयर लॉक' लावावे, प्रत्येक बसमध्ये सीटच्या मागे 'तक्रार निवारण टठ कोड' अनिवार्य करावा तसेच सर्व ऑनलाइन बूकिंग पोर्टलची तपासणीसह आरटीओच्या फ्लाईंग स्कॉडद्वारे अचानक तपासणी करून जादा भाडे वसूल करणाऱ्या बसेसचे परवाने तात्काळ निलंबित करावेत.

# अल्लू अर्जुनच्या चाहत्यांचा मोठा पुढाकार, ८ राज्यांमध्ये ८२० कार्यक्रमांच्या माध्यमातून ३ लाखांहून अधिक मुलींपर्यंत पोहोचवला HPV लसीकरण जनजागृतीचा संदेश!





अल्लू अर्जुन हे खरोखरच अशा महान अभिनेत्यांपैकी एक आहेत, जे बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरण्यासोबतच प्रेक्षकांच्या मनावरही राज्य करतात. त्यांनी स्वतःला एक खरा पॅन-इंडिया सुपरस्टार म्हणून प्रस्थापित केले आहे. देशासोबतच परदेशातही त्यांची जबरदस्त फॅन फॉलोइंग आहे. सुपरस्टार बनल्यानंतर समाजाला काहीतरी परत देण्याच्या त्यांच्या बांधिलकीसाठीही त्यांचे तितकेच कौतुक केले जाते.

या अभियानाअंतर्गत त्यांनी आपल्या अल्लू अर्जुन फॅन असोसिएशन (AAFA)च्या माध्यमातून देशभरातील कझत लसीकरण जनजागृती कार्यक्रमांना पाठिंबा दिला आहे, ज्याद्वारे मोठ्या संख्येने लोकांपर्यंत पोहोचून उल्लेखनीय काम केले जात आहे.

### अल्लू अर्जुनच्या चाहत्यांकडून आरोग्य जनजागृतीचा संदेश; सोलापूरमध्ये HPV लसीकरण मोहिमेला सुरुवात

AAFAची टीम कझत लसीकरण जनजागृती कार्यक्रम मोठ्या स्तरावर समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचवत आहे. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, ओडिशा आणि अंदमान-निकोबार बेटे अशा आठ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुमारे ८२० कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या उपक्रमांद्वारे ३ लाखांहून अधिक मुलींना कझत लसीकरणाबाबत जागरूक करण्यात आले आहे. देशभरातील अनेक लोकांना लाभ देणारा हा खरोखरच एक मोठा आणि महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

# आमदार अनुराधाताई चव्हाण यांच्या पाठपुराव्याला यश!

छत्रपती संभाजीनगर, दि. १० (प्रतिनिधी) -गिरजा नदीवरील निमखेडा बॅरेजला मंजुरी!! मुख्यमंत्री ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब, जलसंपदा मंत्री ना.श्री.राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांचे मनःपूर्वक धन्यवाद..

गिरजा नदीवरील निमखेडा कोल्हापुरी बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रूपांतर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आजच्या नियामक मंडळाच्या बैठकीत मंजूर झाला. यासाठी आपला सातत्याने पाठपुरावा सुरू होता. या बॅरेजमुळे पाणीसाठवण क्षमता वाढण्यासोबतच परिसरातील शेतीला मोठा फायदा होणार आहे. शेतकऱ्यांना सिंचनासाठी अधिक पाणी उपलब्ध होईल, पिकांची उत्पादकता वाढण्यास मदत होईल आणि पाण्याची उपलब्धता अधिक स्थिर होईल. साताळिपंप्री आणि परिसरातील शेतकऱ्यांसाठी हा निर्णय दिलासादायक असून, गिरजा नदीच्या पाण्याचा अधिक प्रभावी वापर करून शेतीच्या विकासाला चालना मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे. निमखेडा बॅरेजच्या मंजुरीमुळे परिसरातील जलसंधारण आणि सिंचन व्यवस्थेला नवी ताकद मिळणार आहे..

# सिडको जैन मंदिरात मानस्तंभ जीर्णोद्धाराचा शिलान्यास

छत्रपती संभाजीनगर, दि. १० (प्रतिनिधी) - श्री १००८ कलिकुंड पार्श्वनाथ सैतवाल दिगंबर जैन मंदिर सिडको छ-९ छत्रपती संभाजी नगर येथे मानस्तंभाच्या जीर्णोद्धाराचा शिलान्यास कार्यक्रम अतिशय हर्षोल्लासात संपन्न झाला जीर्णोद्धार कार्यक्रमांमध्ये प्रेरणास्थानी आचार्य पवित्र सागर महाराज मुनिश्री प्रशांत सागर महाराज आणि मुनिश्री प्रभाव सागर महाराज याचा आशीर्वादाने झाला यावेळेस आचार्य श्री १०८ सुयशगुप्ती महाराज सानिध्यात व उपस्थित झाले आपल्या प्रवचनात गुरुदेवांनी मानस्तंभाचे महत्त्व सांगितले. हा मानस्तंभ पांढऱ्या जयपुरी आगरिया मार्बल मध्ये बनवन्यात येणार आहे. तसेच याचे फाउंडेशन पूर्ण काळ्या दगडामध्ये बनवण्यात येणार आहे. या मानस्तंभात चार दिशेला चार हत्ती, चार दिशेला चार इंद्र आणि सुंदर नक्षी काम असलेला मानस्तंभ संपूर्ण महाराष्ट्रात पहिल्यांदाच तयार करण्यात येत आहे. या मानस्तंभाचे आयुष्य जवळपास ५०० वर्ष इतके राहणार आहे. अशा या दिव्य मानस्तंबाच्या प्राणप्रतिष्ठा पं. विकास भैया आणि पं. नितीन जैन यांच्या हस्ते झाली. मुख्य दांतरामध्ये कैलास जी बाळशेट्टी (संपूर्ण बाळशेट्टी परिवार ) प्रकाश जी भाकरे सुमन ताई सांगोले प्रज्ञा देशमाने चंदाताई ढोले वसंतराव जी मनोरकर अमोल मोगले दिगंबरजी क्षीरसागर चैतन्याची गाडेकर तसेच समाजचे अनेक दानवीर यांनी यामध्ये सहभाग नोंदवला पूर्ण समाजाच्या देणगीतून हा मानस्तंभ उभारण्यात आला आहे. आचार्य श्री सुयश गुप्ती महाराजांनी कार्यक्रमाबद्दल आनंद व्यक्त केला व विश्वस्त मंडळाची, महीला मंडळ,बहु मंडळ,व छात्रावास कमिटी या सर्वांची उत्तम कामगिरी बद्दल त्यांचे अभिनंदन व आशीर्वाद प्रदान केले.



# शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर नैतिक मूल्ये रुजविणे आवश्यक आहे. -डॉ. भालचंद्र मुणगेकर

मुंबई, दि. १० (प्रतिनिधी) - चेतना हजारीमल सोमाणी कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, श्रीमती कुसुमताई चौधरी कॉलेज ऑफ आर्ट्स आणि चेतना माजी विद्यार्थी संघाच्या सहकार्याने शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. संजय जगताप यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी कनिष्ठ तसेच पदवी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापिकांचा त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. शिक्षकांच्या समर्पित कार्याचा गौरव करताना यावेळी तीन शिक्षकांना 'उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या उत्कृष्ट अध्यापनकार्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी शिक्षकांच्या कार्यातील 'देण्याची भावना' ही सदैव प्रशंसनीय असल्याचे अधोरेखित केले. शिक्षक हे केवळ ज्ञान देणारे नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर माणुसकी, संवेदनशीलता, सामाजिक बांधिलकी आणि नैतिक मूल्ये रुजविणे आवश्यक आहे, असे डॉ. मुणगेकर यांनी सांगितले. शिक्षणाच्या माध्यमातून चांगला नागरिक आणि संवेदनशील माणूस घडविण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शिक्षक दिनाचा हा सोहळा शिक्षकांच्या समर्पणाचा, ज्ञानदानाच्या कार्याचा आणि समाजनिर्मितीतील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचा गौरव करणारा ठरला.

# अनधिकृत लिंकपासून सावध राहा ; महाराष्ट्र राज्य हज समितीचे आवाहन

मुंबई दि. ८ (प्रतिनिधी ) - हज-२०२७ यात्रेसाठी वैद्यकीय तपासणी व वैद्यकीय प्रमाणपत्राच्या अनुषंगाने काही अनधिकृत लिंक समाजमाध्यमे तसेच व्हॉट्सॲपद्वारे प्रसारित होत असल्याचे महाराष्ट्र राज्य हज समितीच्या निदर्शनास आले आहे. या लिंक समितीकडून अधिकृतरीत्या प्रसारित करण्यात आलेल्या नसून अनधिकृत आहेत. त्यामुळे यात्रेकरूंनी अशा लिंकवर वैयक्तिक, ओळखविषयक अथवा वैद्यकीय माहिती भरू नये, असे आवाहन महाराष्ट्र राज्य हज समितीने केले आहे.

हज-२०२७ साठी निवड झालेल्या यात्रेकरूंची वैद्यकीय तपासणी शासकीय रुग्णालयांमार्फत करण्यात येणार आहे. संबंधित यात्रेकरूंचे कव्हर क्रमांक व नावे संबंधित जिल्हा शल्यचिकित्सक तसेच शासकीय आरोग्य यंत्रणांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. आवश्यक वैद्यकीय तपासणीनंतर संबंधित शासकीय रुग्णालयामार्फत वैद्यकीय प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यामुळे वैद्यकीय प्रमाणपत्रासाठी कोणत्याही अनधिकृत संकेतस्थळावर माहिती भरण्याची आवश्यकता नाही.

अनधिकृत संकेतस्थळांवर माहिती भरल्यास माहितीची गळती, गोपनीयतेचा भंग, माहितीचा गैरवापर तसेच आर्थिक अथवा सायबर फसवणुकीचा धोका संभवतो. त्यामुळे कोणत्याही लिंकचा वापर करण्यापूर्वी तिची अधिकृतता व विश्वासार्हता पडताळून पाहावी, असे समितीने स्पष्ट केले आहे.

मुंबईतील हज यात्रेकरूंच्या वैद्यकीय तपासणीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेची रुग्णालये तसेच अन्य शासकीय रुग्णालयांमध्ये व्यवस्था करण्यात येत आहे. संबंधित रुग्णालयांची यादी व तपासणीची सविस्तर माहिती व्यवस्था निश्चित झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य हज समितीमार्फत अधिकृतरीत्या जाहीर करण्यात येईल. हज-२०२७ संदर्भातील अधिकृत माहिती व सूचनांसाठी महाराष्ट्र राज्य हज समितीशीच संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# डाक अदालत १५ सप्टेंबर रोजी

छत्रपती संभाजीनगर, दि.१० (प्रतिनिधी) - टपाल विभागातील सेवांबाबत असलेल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी सोमवार, दि. १५ रोजी डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर डाक विभागाच्या सेवांबाबत प्राप्त तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झाले नसेल, अशा तक्रारींची दखल या डाक अदालतीमध्ये घेतली जाणार आहे. संबंधितांनी डाक सेवांबाबतची आपली तक्रार दि. १० पर्यंत प्रवर अधीक्षक, डाकघर, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ यांच्या नावे दोन प्रतींत पाठवावी. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारींची दखल घेतली जाणार नाही, असे प्रवर अधीक्षक, डाकघर, छत्रपती संभाजीनगर विभाग यांनी कळविले आहे.

# बॉन्ड्सइंडियाचे 'डिजिफिन' म्हणून रीब्रँडिंग; ५ वर्षांत ५० शहरांमध्ये विस्ताराचे उद्दिष्ट




मुंबई दि.१० (प्रतिनिधी ) : भारतातील अग्रेसर डिजिटल फिक्स्ड इनकम इन्व्हेस्टमेंट प्लॅटफफॉर्म असलेल्या 'बॉन्ड्सइंडिया'ने आज 'डिजिफिन' या नव्या नावाने आपल्या रीब्रँडिंगची अधिकृत घोषणा केली. ही नवी ओळख कंपनीच्या केवळ बॉण्ड-केंद्रित मार्केटप्लेसवरून फिक्स्ड इनकम गुंतवणुकीसाठी एका सर्वसमावेशक डिजिटल प्लॅट फॉर्म बनण्याच्या दिशेने झालेल्या विकासाचे प्रतीक आहे. रीटेल गुंतवणूकदार, बँका आणि संस्थांसाठी गुंतवणूक अधिक सोपी, पारदर्शक आणि सुलभ बनवतानाच डिजिटल फिक्स्ड इनकम उत्पादनांचा विस्तृत संच प्रदान करण्याचा डिजिफिनचा दृष्टिकोन आहे. या रीब्रँडिंगला 'एशिरस ग्रुप' आणि 'डिजिफिन फाउंडेशन'चा भक्कम पाठिंबा लाभला आहे.

या घोषणेप्रसंगी बोलताना डिजिफिनचे संस्थापक अंकित गुप्ता म्हणाले, 'जेव्हा आम्ही बॉन्ड्सइंडिया म्हणून सुरुवात केली, तेव्हा रीटेल गुंतवणूकदारांसाठी बॉन्ड्समधील गुंतवणूक सोपी करणे हा आमचा उद्देश होता. गेल्या काही वर्षांत आम्ही १.७५ लाखांहून अधिक वापरकर्त्यांचा विश्वास संपादन केला आहे. डिजिफिन याच मोठ्या व्हिजनचे प्रतिनिधित्व करतो. आमच्या वाढीचा पुढील टप्पा मेट्रो शहरांच्या पलीकडे विस्तार करणे, उदयोन्मुख शहरांपर्यंत पोहोचणे आणि तंत्रज्ञानावर आधारित गुंतवणुकीद्वारे अधिक भारतीयांना त्यांच्या कष्टाची बचत दीर्घकालीन संपत्तीमध्ये रूपांतरित करण्यास मदत करण्यावर केंद्रित असेल.'

ते पुढे म्हणाले, 'कॉर्पोरेट बॉन्ड्समध्ये रीटेल सहभाग अजूनही सुरुवातीच्या टप्प्यात आहे आणि याबद्दलची जागरूकता केवळ १०% आहे. ही अप्रवेशित बाजारपेठ डिजिफिनसाठी फिक्स्ड इनकम गुंतवणुकीचा विस्तार करण्याची आणि लाखो पहिल्यांदा गुंतवणूक करणाऱ्यांना अधिकृत गुंतवणूक प्रणालीमध्ये आणण्याची मोठी संधी प्रस्तुत करते.'

डिजिफिनने आतापर्यंत ९० बॉण्ड इश्यूजमध्ये १४,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त व्यवहारांची सुविधा उपलब्ध करून दिली असून आज १.७५ लाखांहून अधिक वापरकर्त्यांना सेवा देत आहे. पात्र गुंतवणूकदार अवघ्या ३ मिनिटांत केवायसी पूर्ण करून या प्लॅटफफॉर्मवर जोडले जाऊ शकतात. आपल्या वाढीच्या पुढील टप्प्यात कंपनीचे पुढील ५ वर्षांत ५० हून अधिक शहरांमध्ये उपस्थिती प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट असून, भारताच्या टियर III आणि टियर खत बाजारपेठेवर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल. तसेच पुढील २ वर्षांत मनुष्यबळ दुप्पट करण्याचे नियोजन आहे. भारताची गुंतवणूक प्रणाली सध्या महत्त्वाच्या बदलातून जात असून देशात २१.६ कोटींपेक्षा जास्त डिमॅट खाती आहेत. कॉर्पोरेट बॉण्ड मार्केट गेल्या दशकात १२ टक्के वार्षिक दराने वाढले असले, तरी अजूनही १ टक्के पेक्षा कमी भारतीय कुटुंबे यात गुंतवणूक करतात. ही तफावत भरून काढण्यासाठी डिजिफिन पुढाकार घेत आहे.

# श्री.गणपतीची मूर्ती शाडू मातीची नैसर्गिक व पर्यावरण पूरक एकदंत चतुर्भुज लंबोदर सुपासारखे कान असलेली असावी- वेदमूर्ती अनिरुद्ध देशमुख

### वि.हिं.प. मंदिर अर्चक पुरोहित आयामा तर्फे आयोजित कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर, दि. १० (प्रतिनिधी) - मातीपासून श्रीगणेशाची मूर्ती तयार करून तिची पूजा करणे आणि उत्सवानंतर ती पुन्हा जलात विसर्जित करणे, यात एक सुंदर आध्यात्मिक संदेश आहे. पंचमहाभूतांपासून निर्माण झालेले शरीर पुन्हा पंचमहाभूतांत विलीन होते. महाराष्ट्रात घरगुती गणेशोत्सवाची परंपरा पेशवेकाळापासून विशेष प्रसिद्ध झाली. नंतर १८९०च्या दशकात सार्वजनिक गणेशोत्सवाला व्यापक स्वरूप मिळाले.

परंपरेनुसार गणेशमूर्तीमध्ये साधेपणा आणि प्रसन्नता महत्त्वाची मानली जाते. शाडू मातीची, नैसर्गिक व पर्यावरणपूरक मूर्ती उत्तम शास्त्रोक्त मानली जाते. मूर्ती एकदंत, चतुर्भुज, लंबोदर, सुपासारखे कान असलेली असावी, असे गणपत्यथर्वशीर्षातील वर्णनाशी संबंधित मूर्तीविज्ञानात सांगितले जाते असे प्रतिपादन श्रीकृष्ण गुरुकुल वेद पाठशाळेचे प्रधानाचार्य वेदमूर्ती श्री.अनिरुद्ध देशमुख यांनी केले

वेदमूर्ती श्री अनिरुद्ध देशमुख विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयाम चिकलठाणा भाग छत्रपती संभाजी नगर तर्फे गणेशनगर हाऊसिंग सोसायटी सिडकोच्या श्री गणपती मंदिरात रविवार दिनांक ६ सप्टेंबर रोजी आयोजित केलेल्या घरगुती गणेश स्थापना प्राणप्रतिष्ठा पूजा या विषयावरील कार्यशाळेत बोलत होते यावेळी व्यासपीठावर श्री गणेश मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष कैलास जंजाळ विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांत उपाध्यक्ष कुंदाताई अंदुरे श्री गोपाळराव पाठक काका आणि मंदिर आयाम चिकलठाणा भाग प्रमुख श्री शिवाजीराव दहिवाळ उपस्थित होते.

यावेळी बोलताना वेदमूर्ती अनिरुद्ध देशमुख म्हणाले घरगुती पूजेसाठी फार मोठी मूर्ती आवश्यक नाही; लहान, सात्त्विक आणि सुबक मूर्ती अधिक योग्य. डावीकडे वळलेली सोंड असलेली मूर्ती घरगुती पूजेत सामान्यतः प्रचलित आहे यापेक्षाही शास्त्रोक्त पूजा आणि श्रद्धा अधिक महत्त्वाची आहे.

विषयाच्या मांडणीनंतर वेदमूर्ती देशमुख यांनी उपस्थितांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. या कार्यशाळेत प्रास्ताविक मंदिर आयामाच्या देवगिरी प्रांत महिला सहप्रमुख सौ अनुराधा पुराणिक सूत्रसंचालन चिकलठाणा भाग प्रमुख शिवाजीराव दहिवाळ आणि आभार प्रदर्शन मंदिर आयामाच्या प्रांत महिला प्रमुख सौ राजश्री भिते यांनी केले यांनी केले. या कार्यशाळेला माधुरी ताई अदवंत तृप्ती हरसूलकर स्वाती जोशी रेणुका जोशी अरुणराव जाधव शुभम पठाडे वेदमूर्ती मंदार पाठक रोहित स्वामी राजेंद्र पाथरीकर दिलीप राऊत राधेश्याम पांडे गिरीधर पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# जालना जिल्ह्यात १८ हजार २७६ कुणबी जात प्रमाणपत्रांचे वितरण-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

## मराठा समाजाच्या मागण्याबाबत शासन सकारात्मक, उपोषण मागे घेण्याचे आवाहन; प्राप्त अर्जांपैकी ९९.९ टक्के अर्ज मंजूर; एकही अर्ज प्रलंबित नाही

जालना दि.१० (प्रतिनिधी)- कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी जातीचे प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने केलेल्या अभिलेख तपासणीत जालना जिल्ह्यात एकूण ५ हजार २७ नोंदी आढळल्या आहेत. या नोंदींच्या आधारे जिल्ह्यात प्राप्त १८ हजार २९५ अर्जांपैकी १८ हजार २७६ अर्ज मंजूर करून जात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. मंजूर अर्जांचे प्रमाण ९९.९ टक्के आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी पत्रकार परिषदेत दिली. राज्य शासनाने उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या १५ मागण्यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेतले आहेत. त्यामुळे श्री. जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घ्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत मराठा-कुणबी समाजाच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने शासन व जिल्हा प्रशासनाने मागील तीन वर्षांत केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी यावेळी दिली.

महाराष्ट्र हे प्रगतिशील, आधुनिक आणि विकासाभिमुख राज्य आहे. त्यामुळे समाजातील सर्व घटकांनी मतभेद टाळून शिक्षण, कौशल्यविकास, रोजगार आणि सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करावे. मानवता ही प्रत्येकाची पहिली ओळख असली पाहिजे. जिल्ह्यातील तीन लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी सामाजिक सलोखा आणि मानवतेचा संदेश देणारी दैनंदिन प्रार्थना करत आहेत, असे जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी सांगितले.

मनोज जरांगे पाटील यांच्या आरोग्याची तपासणी आणि उपचारांसाठी वैद्यकीय पथक चोवीस तास कार्यरत आहे. त्यांची प्रकृती डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली आहे. शासनाने विविध मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतले असून, उर्वरित प्रकरणांवर कायदेशीर प्रक्रियेनुसार कार्यवाही सुरू आहे. प्रत्येक प्रशासकीय कार्यवाही निर्धारित कायदेशीर प्रक्रियेतच पूर्ण करावी लागते. त्यामुळे श्री. जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घ्यावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी केले.

श्रीमती मित्तल म्हणाल्या की, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे. जिल्ह्यात अवैध मद्यविक्रीविरोधात कठोर कारवाई करण्यात येत असून, नऊ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. परिसरातील मद्यबंदी पुढील आदेशापर्यंत सुरू राहणार आहे. अंतरवाली सराटी गावातील शाळा, अंगणवाडी आणि अन्य पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

मित्तल म्हणाल्या की, निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने केलेल्या अभिलेख तपासणीनंतर प्राप्त नोंदीच्या आधारे प्राप्त १८ हजार २९५ अर्जांपैकी १८ हजार २७६ अर्ज मंजूर केले असून उर्वरित १९ अर्जांमध्ये इतर जिल्ह्यांतील पुरावे असल्याने ते नामंजूर करण्यात आले. अर्ज नामंजूर होण्याचे प्रमाण केवळ ०.१ टक्का आहे. सध्या जिल्ह्यात जात प्रमाणपत्र वितरणासाठी एकही अर्ज प्रलंबित नाही. तालुकानिहाय मंजूर अर्जांमध्ये जालना तालुक्यात १ हजार ३४०, बदनापूर १ हजार ४३६, अंबड ३ हजार १८५, घनसावंगी ५४०, भोकरदन ६ हजार ३१८, जाफ्राबाद ९९४, परतूर २ हजार ४१८ आणि मंठा तालुक्यात २ हजार ४५ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत.

दि. २ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार हैदराबाद गॅझेटिअरच्या आधारे जिल्ह्यात एकूण ४२१ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी ३७७ अर्ज मंजूर करून प्रमाणपत्रांचे वितरण



करण्यात आले, तर ४४ अर्ज नामंजूर करण्यात आले. या प्रक्रियेतील एकही अर्ज सध्या प्रलंबित नाही.

समितीच्या तपासणीत आढळलेल्या सर्व नोंदी आणि नोंदींची यादी जिल्हा प्रशासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यालयांच्या सूचना फलकांवरही संबंधित याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्रे सुलभतेने उपलब्ध करून देण्यासाठी दि. १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत महसूल मंडळनिहाय विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांमध्ये आवश्यक पुराव्यांसह कागदपत्रे सादर करून पात्र नागरिकांनी अर्ज करावा, असे आवाहन श्रीमती मित्तल यांनी यावेळी केले.

आज दि. १० सप्टेंबर रोजी जालना जिल्ह यातील देवमुर्ती,सावंगी तलाव (जालना), बदनापूर,(बदनापूर) , अंबड (अंबड) , कुंभार पिपळगाव , राणी उंचेगाव (घनसावंगी), आष्टीं, (परतूर) ,पांगरी गोसावी (मंठा), आन्वीा, दानापूर, पिंपळगाव रेणूकाई (भोकरदन) ,माहोरा(जाफ्राबाद) अशा एकुण १२ महसूल मंडळात शिबीर आयोजीत करण्यापत आलेले आहे. सदर शिबीरात आतापर्यंत २२ अर्ज प्राप्तर झाल्याअबाबत प्राथमिक माहिती असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

पात्र नागरिकांनी उपलब्ध नोंदी तपासून आवश्यक पुरावे आणि कागदपत्रांसह विशेष शिबिरांमध्ये अथवा संबंधित तहसील कार्यालयात अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी यावेळी केले.

जालना जिल्ह्यात मराठा समाजाला देण्यात आलेल्या १० टक्के एसईबीसी आरक्षणानुसार वर्ष २०२४ ते २०२६ या कालावधीत एकूण ३५ हजार ९८१ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. यामध्ये २०२४ मध्ये १० हजार ३५, २०२५ मध्ये १६ हजार १८० आणि २०२६ मध्ये ९ हजार ७६६ प्रमाणपत्रांचा समावेश आहे.

तालुकानिहाय जालना येथे ५ हजार १७५, बदनापूर ३ हजार २०, भोकरदन ७ हजार ७५, जाफ्राबाद ३ हजार ५४१, परतूर ५ हजार ३००, मंठा ३ हजार ४००, अंबड ४ हजार ६४८ आणि घनसावंगी तालुक्यात ३ हजार ८२२ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे, असे त्यांनी सांगितले.

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे एकूण १ हजार ६६४ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी १ हजार १६ प्रकरणे वैध ठरविण्यात आली आहेत. २३ प्रकरणे अवैध ठरली असून, आवश्यक पुरावे व त्रुटींची पूर्तता न केल्याने १३३ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. सध्या ४९२ अर्ज पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. त्यापैकी ४७३ अर्ज ९० दिवसांच्या आतील, तर १९ अर्ज ९० दिवसांपेक्षा अधिक कालावधीतील आहेत. प्रलंबित प्रकरणांचा नियमानुसार लवकरात लवकर निपटारा करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात आल्या असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

कुणबी जात प्रमाणपत्रासंदर्भातील नागरिकांच्या अडचणी आणि तक्रारी सोडविण्यासाठी उपजिल्हाधिकारी शिरीष यादव यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात ०२४८२-२२३१३२ हा हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आला आहे. कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत नागरिकांना या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी दिले. शासनाने ७ सप्टेंबर रोजी मराठा-कुणबी समाजातील विद्यार्थी आणि युवकांच्या हितासाठी विविध निर्णय घेतले आहेत. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेसाठी राज्यस्तरावर २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. परदेशी शिष्यवृत्तीअंतर्गत शिक्षण शुल्क थेट संबंधित विदेशी विद्यापीठांना अदा करण्यात येणार आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा फायदा होणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. तसेच १ ऑक्टोबरपासून मराठा-कुणबी समाजातील १ हजार ४४० युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षणातून एक हजारांपेक्षा अधिक युवकांसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व गणेशोत्सव तयारीचा आयुक्त अमोल येडगे यांनी घेतला संयुक्त आढावा

## गणेश विसर्जन मार्ग खड्डेमुक्त व अतिक्रमणमुक्त ठेवण्याच्या सूचना

छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- मराठवाडा मुक्ती संग्राम दिन तसेच आगामी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी आज संयुक्त आढावा बैठक घेऊन विविध विभागांच्या तयारीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, कल्पिता पिंपळे, शहर अभियंता संजय कोंबडे, अतिरिक्त शहर अभियंता अमोल कुलकर्णी, उपायुक्त विकास नवाळे, नंदकिशोर भोंबे यांच्यासह सर्व कार्यकारी अभियंता व उपअभियंता उपस्थित होते.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त दि. १७ सप्टेंबर रोजी आयोजित कार्यक्रमाच्या तयारीचा यावेळी आढावा घेण्यात आला. संबंधित सर्व कामे वेळेत, नियोजनबद्ध आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्त श्री. येडगे यांनी दिल्या.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील गणेश विसर्जन व्यवस्था, मिरवणूक मार्ग, कृत्रिम तलाव, विसर्जन विहिरी, रस्ते दुरुस्ती, बॅरिकेटिंग, प्रकाश व्यवस्था आणि वाहतूक व्यवस्थेचा आयुक्तांनी आढावा घेतला.

गणेश विसर्जनाच्या मिरवणूक मार्गावरील खड्डे तातडीने बुजवून मार्ग खड्डेमुक्त व अतिक्रमणमुक्त ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले. मिरवणूक मार्गावर पाणीपुरवठा किंवा इतर पाईपलाईन टाकण्यासाठी ज्या ठिकाणी रस्ते खोदण्यात आले आहेत, ते संबंधित विभाग व ठेकेदारांकडून तातडीने पूर्ववत करून घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

विसर्जन विहिरी व कृत्रिम तलावांची स्वच्छता, सुरक्षितता आणि आवश्यक सुविधा वेळेत पूर्ण करण्यासोबतच विसर्जनाच्या ठिकाणी पुरेशी प्रकाश व्यवस्था ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. गणेश विसर्जनाचे वेबकास्टिंग करण्याबाबतही संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.

याशिवाय गणेश विसर्जनासाठी आवश्यकतेनुसार कन्व्हेयर बेल्टचा वापर करण्याचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. विनापरवानगी स्थापन करण्यात आलेल्या गणेश मंडळांना नियमानुसार परवानगी घेण्यासाठी प्रवृत्त करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले.

झोन क्रमांक १ अंतर्गत पडेगाव व मिटमिटा परिसरात कृत्रिम तलाव उभारणे (रु. ११,५९,४३८), कला हाऊसिंग सोसायटी येथील खुल्या जागेत कृत्रिम तलाव उभारणे (रु. १,९९,६४५) आणि बेगमपुरा-पहाडसिंगपुरा अंतर्गत विद्युत कॉलनी येथे कृत्रिम तलाव उभारणे (रु. १,९८,८८५) अशी कामे प्रस्तावित आहेत.

विद्युत कॉलनी व कला हाऊसिंग सोसायटी येथील मंजूर रेखांकनातील खुल्या जागेत तात्पुरते बॅरिकेटिंग करण्यासाठी रु. १,९८,२४०, सोनेरी महलजवळील तलाव परिसरात स्टेज व कर्मचाऱ्यांसाठी मंडप व्यवस्थेसाठी रु. १,९९,२८२ तसेच कला हाऊसिंग सोसायटी येथील विसर्जन मार्गावरील खड्डे मुरूम व जीएसबी टाकून बुजविण्यासाठी रु. १,९९,५३० इतकी निविदा किंमत आहे.

सोनेरी महल व विद्युत कॉलनी येथील विसर्जन मार्गावरील खड्डे मुरूम व मेटल टाकून बुजविण्यासाठी रु. १,९८,५९०, तर झोन क्रमांक १ अंतर्गत विविध ठिकाणी विसर्जन मार्गावरील खड्डे मेटल टाकून बुजविण्यासाठी रु. १,९९,५८३ इतकी निविदा किंमत आहे.

भावसिंगपुरा येथील गणपती विसर्जन विहिरीतील गाळ काढणे व इतर आवश्यक कामांसाठी रु. १,९६,९८९ इतकी तरतूद असून, प्रभाग क्रमांक १ मधील विविध ठिकाणी सिमेंट काँक्रीट पॅचवर्क व मुरूम टाकण्याचे कामही करण्यात येणार आहे.

झोन क्रमांक २ अंतर्गत जिल्हा परिषद मैदानावरील गणेश विसर्जन विहिरीतील गाळ काढणे, सफाई, रंगरंगोटी व इतर अनुषंगिक कामांसाठी रु. ८,४४,५३४ इतकी निविदा किंमत आहे.

मिरवणूक मार्गावरील विविध ठिकाणी लाकडी बल्ल्या व लोखंडी पत्र्याचे बॅरिकेटिंग करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी रु. ५,९८,६९७ इतकी तरतूद करण्यात आली आहे.



संस्थान गणपती, शहागंज ते महात्मा गांधी पुतळा, सिटी चौक, सुपारी हनुमान मंदिर, गुलमंडी चौक, महात्मा ज्योतिबा फुले चौक ते जिल्हा परिषद मैदान या मिरवणूक मार्गावरील डांबरी पॅचवर्कसाठी रु. २४,९७,०८० इतकी निविदा किंमत आहे.

संभाजी पेठ, जिल्हा परिषद मैदान येथे लहान मूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलाव उभारण्यासाठी रु. १,९९,१८२ इतकी निविदा किंमत आहे. तसेच एक, तीन, पाच व सात दिवसांच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी संभाजी पेठ विसर्जन विहिरीच्या बाजूला अंदाजे ५ फूट ' २० फूट आकारमानाच्या ट्रेंचेस खोदून तात्पुरती विसर्जन व्यवस्था करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

झोन क्रमांक ५ अंतर्गत राजीव गांधी मैदान येथे गणेश विसर्जनासाठी कृत्रिम तलाव तयार करण्यासाठी रु. ७,९६,१३३ इतक्या रकमेची निविदा मागविण्यात आली आहे.

झोन क्रमांक ९ अंतर्गत पंचवटी चौक ते रेल्वे स्टेशन चौक ते क्रांती चौक मार्गे संभाजी पेठ या मिरवणूक मार्गावरील रस्त्याचे पॅचवर्क करण्यासाठी रु. १२ लाखांची निविदा मागविण्यात आली आहे.

गणेशोत्सवाच्या कालावधीत नागरिकांना सुरक्षित, सुलभ व सुरळीत विसर्जन व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. मिरवणूक मार्गावरील रस्ते, प्रकाश व्यवस्था, स्वच्छता, बॅरिकेटिंग, वाहतूक व्यवस्था आणि विसर्जनस्थळांवरील आवश्यक सुविधा ही सर्व कामे नियोजित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्त श्री. अमोल येडगे यांनी यावेळी दिल्या. गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे निर्देशही आयुक्तांनी दिले.

# मराठा कुणबी जात प्रमाणपत्र: बैलपोळा असूनही शिबिरांना गर्दी; माहिती,नोंदी बघून अर्ज केले दाखल




छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- मराठा कुणबी, कुणबी, कुणबी मराठा जात प्रमाणपत्रांचेअवलोकन व प्रमाणपत्रांसाठी आज जिल्ह्यात सर्व तालुक्यात मंडळनिहाय शिबिरांचे आयोजन करण्यात आले. पाचोड ता. पैठण येथील शिबिरास आ. विलास भुमरे यांनी भेट देऊन पाहणी केली व माहिती घेतली. आज जिल्ह्यात भावसिंगपुरा, चौका ता.छत्रपती संभाजीनगर, पाचोड, आडूळ ता. पैठण,आळंद ता.फुलंब्री, खुलताबाद, नाचनवेल ता. कन्नड, भराडी ता. सिल्लोड, वाळूज ता. गंगापूर, शिऊर ता. वैजापूर येथे आज शिबिरे पार पडली. बैलपोळा असूनही आज शेतकऱ्यांनी व ग्रामिण भागातील लोकांनी शिबिरांमध्ये माहिती घेण्यासाठी गर्दी केली होती. सकाळच्या सत्रात लोक माहिती घेण्यासाठी येत होते. त्यापैकी अनेकांनी आपली जात प्रमाणपत्रासाठीची प्रकरणे दाखल केली.

भावसिंगपुरा, चौका ता.छत्रपती संभाजीनगर येथे- भावसिंगपुरा येथे १० लोकांनी भेटी दिल्या. ४ जणांनी अर्ज दाखल केले. चौका येथे ७० अर्ज दाखल झाले. परिपूर्ण अर्ज सहा होते.पाचोड, आडूळ ता. पैठण-७० लोकांनी भेटी दिल्या व ३० अर्ज दाखल झाले, त्यातील परिपूर्ण असलेले तीन अर्ज होते.आळंद ता.फुलंब्री,३० लोकांनी भेटी दिल्या. भराडी,बोरगाव बाजार ता. सिल्लोड येथे ४० लोकांनी भेटी दिल्या व माहिती जाणून घेतली.गारज, शिऊर ता. वैजापूर येथे ३९ अर्ज दाखल झाले. ४४ लोकांनी भेटी दिल्या.

उद्या शुक्रवार दि.११ रोजी वरुड काझी, पिसादेवी ता.छत्रपती संभाजीनगर, आपेगाव, विहामांडवा ता.पैठण, बाबरा ता. फुलंब्री, वेरुळ ता. खुलताबाद, देवगाव रंगारी, चापानेर ता. कन्नड, सिल्लोड, पालोद, निल्लोड ता. सिल्लोड, सोयगाव,सावळदबारा ता. सोयगाव, आसेगाव, गाजगाव ता. गंगापूर, लोणी खु., जाणेफळ ता. वैजापूर. येथे शिबिरे आयोजीत करण्यात आली आहेत. या शिबिरांमध्ये भेटी देऊन आपल्या जातप्रमाणपत्र व नोंदींची माहिती घ्यावी,असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# वैजापूरात दुष्काळी सावट असतांनाही बळीराजाने'बैल पोळा'साजरा केला



वैजापूर दि.१० (प्रतिनिधी)- या वर्षी मराठवाडाभर पावसाअभावी अत्यंत भयानक स्थिती असतानाही वैजापूर शहर व तालुक्यातील शेतकरी बांधवानी' पोळा दिनी' गुरुवार(ता,१०)रोजी आपल्या बैलांना सजवून'बैल पोळा'हा बैलांचा सण साजरा केला.शहरात सायंकाळ पासून पाटील गल्लीतील श्री मारुती मंदिर येथे सजविलेल्या बैलांना आणून मारुती चे दर्शन घडविले ,नंतर शहराच्या मुख्य रस्त्यावरून संकट मोचन हनुमान मंदिरा पर्यंत पळत नेऊन तेथेही हनुमान दर्शन घडविले व घरी नेले तेथे सुहासिनीनी आरती करून बैलांना'पूरण -पोळी'नैवेद्य दिले,या दरम्यान इयत्ता पाचवी वर्गाला धोंडीरामसिंह राजपूत यांची'बैल -पोळा' कविता असलेले कवी राजपूत यांनी ही बैलांसोबत बैल पोळा साजरा केला. त्यांच्या समवेत आधार जेष्ठ नागरिक सेवा संघ अध्यक्ष उत्तमराव साळुंके,व श्री वाघ ही 'बैल -पोळा'उत्सवात सहभागी झाले होते. शहर व तालुक्यातील ग्रामीण भागात ही ' बैल पोळा', साजरा झाला. चोख पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता.

# उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्यावर बुधवारी रात्री तीन सलाईनद्वारे उपचार

जालना दि.१० (प्रतिनिधी)- मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे उपोषणास बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची काल दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री साडेअकरा वाजता तपासणी करण्यात आली. यावेळी त्यांना तीन बाटल्या आयव्ही फ्ल्यूड सलाईन लावण्यात आल्याची माहिती जिल्हा आरोग्य यंत्रणेने दिली.

श्री. जरांगे पाटील हे अंतरवाली सराटी येथे अन्न व पाण्याविना उपोषण करीत आहेत. त्यांच्या आरोग्य तपासणी व उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या अधिपत्याखालील वैद्यकीय पथके २४ तास कार्यरत आहेत. दि. ८ सप्टेंबर रोजी श्री. जरांगे पाटील यांना सात सलाईन लावण्यात आल्या होत्या. तसेच दि. ९ सप्टेंबर रोजी दुपारीही त्यांची तपासणी करून एक सलाईन लावण्यात आली होती. त्यानंतर काल दि. ९ सप्टेंबर रोजी रात्री ११.३० वाजता पुन्हा त्यांची तपासणी करण्यात आली. त्यानंतर त्यांना तीन सलाईनद्वारे आयव्हीफ्ल्यूड देण्यात आले असल्याची माहिती जिल्हा आरोग्य यंत्रणेने दिली आहे.

# जयश्री विटेकर यांचे निधन

छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- शहरातील श्रेयनगर परिसरातील ज्येष्ठ नागरिक व योगशिक्षिका जयश्री बळवंत विटेकर (वय ८०) यांचे गुरुवारी (१० सप्टेंबर) वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी प्रतापनगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



(पान १ वरुन)

## टोकाची भाषा सोडा,...

आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून मराठा समाजातील तरुणांना उद्योजक बनवण्यासाठी नियमांमध्ये बदल करण्यात आले, तसेच सारथी संस्थेची स्थापना करण्यात आल्याचे नरेंद्र पाटील यांनी सांगितले.

महामंडळाच्या योजनांच्या सुरुवातीच्या अटी शिथिल करण्यात आल्या. त्यानंतर लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. बँकांकडून व्यवसायासाठी कर्ज घेऊन त्या कर्जावरील व्याजाची जबाबदारी महामंडळाकडून घेण्याची पद्धत सुरू करण्यात आली. यामुळे थेट सरकारी निधी वाटपाऐवजी बँकिंग व्यवस्थेच्या माध्यमातून उद्योजकांना कर्ज उपलब्ध करून देण्याचा मार्ग स्वीकारण्यात आला, असे त्यांनी सांगितले.

## चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग...

भारताने चिनी गुंतवणुकीवर लादलेले काही निर्बंध शिथिल केले आहेत ,विशेषत: इलेक्ट्रॉनिक्स, कॅपिटल गुड्स आणि सोलर सेल क्षेत्रांवर भर दिला गेला आहे.

चिनी कंपन्यांच्या भारतातील प्रस्तावित गुंतवणुकीची आता खुद्द बीजिंगकडूनच अधिक कडक तपासणी केली जात आहे, असे वृत्त रॉयटर्स या वृत्तसंस्थेने सूत्रांच्या हवाल्याने प्रसिद्ध केले. चीनचा अत्याधुनिक उत्पादन आणि उच्च-तंत्रज्ञानाचा समावेश असलेल्या क्षेत्रांच्या तपासणीवर भर आहे. नेत्यांच्या बैठकीसाठी जिनपिंग भारतात येणार आहेत का? याबाबत चिनी परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते गुओ जियाकुन यांनी उत्तर दिले नव्हते. त्यांना याबाबत माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले होते.

## उत्सवखोरांचे वाघ सिंह...

पाहिजे. मला असा समाज आयडियल वाटतो असं विद्यानंद बापट यांनी म्हटलं आहे.

मी गर्वसे कहो हम नास्तिक है इतका मी नास्तिक आहे. सण आणि उत्सवांसारख्या गोष्टी ज्याच्यातून ऐहिक गोष्टींचा आऊटपुट काहीही नाही. त्यामुळे मी नास्तिक आहे हे मी सुरुवातीलाच सांगितलं. ज्या गोष्टी निरुपद्रवी आहेत अशा पद्धतीने सण उत्सव साजरा करायला आमची ना नाही. पण हा निर्णय ज्याचा त्यांनी घ्यायचा आहे. प्रत्येकाचा आनंद हा वेगवेगळा असतो, पण एकाचा आनंद हा दुसऱ्यासाठी शिक्षा असता कामा नये एवढंच मला वाटतं असंही विद्यानंद बापट यांनी म्हटलं आहे.

## मुंढवा जमीन गैरव्यवहार; हायकोर्टाच्या...

यांनी दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी सुरू आहे. याच सुनावणीदरम्यान संबंधित जमीन व्यवहारातील कंपनीच्या संचालकांबाबतची बाब न्यायालयासमोर आली. अल्मेडा एंटरप्रायझेस एलएलपी या कंपनीशी संबंधित ४० एकर सरकारी जमिनीच्या व्यवहाराचा तपास सुरू आहे. तपासादरम्यान कंपनीचे संचालक म्हणून पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील यांची नावे समोर आल्याचे न्यायालयाच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे. मात्र, पोलिसांनी दिग्विजय पाटील यांना आरोपी केले असून पार्थ पवार यांचे नाव आरोपी म्हणून समाविष्ट केलेले नाही. याच विसंगतीकडे न्यायालयाने लक्ष वेधले.

न्यायालयाच्या आदेशात पार्थ पवार प्रभावशाली व्यक्ती असून ते राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांचे पुत्र असल्याने त्यांना आरोपी करण्यात आले नसल्याचा युक्तिवाद नोंदवण्यात आला आहे. हा न्यायालयाचा निष्कर्ष नसून सुनावणीदरम्यान मांडण्यात आलेला युक्तिवाद असल्याचे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. न्यायालयाने या मुद्द्यावर पोलिसांकडून स्पष्ट उत्तर मागितले आहे.

## आता फक्त राष्ट्रपती भवन गुजरातला...

उद्योग आणि प्रकल्प गुजरातकडे वळत असल्याचे चित्र असल्याचा दावा त्यांनी केला.

"केंद्र सरकार फक्त गुजरातचे केंद्र सरकार आहे की संपूर्ण देशाचे?" असा सवाल त्यांनी केला. महाराष्ट्रातील चांगले उद्योग आणि तंत्रज्ञानाशी संबंधित प्रकल्प गुजरातमध्ये जात असल्याचा आरोप करत, "चांगले उद्योग, चांगले पुरस्कार आणि चांगल्या सुविधा गुजरातला द्यायच्या असतील, तर महाराष्ट्राला त्याबदल्यात काय मिळणार?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. उलट महाराष्ट्रात अणुऊर्जा प्रकल्प, रिफायनरी किंवा प्रदूषणकारी उद्योगांसारखे प्रकल्प ठेवले जातात, तर चांगले आणि आधुनिक उद्योग गुजरातमध्ये नेले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.


MAHAGENCO Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**NOTICE INVITING e-TENDER**

| Sr. No. | Tender No. | Tender Details | Estimate Amount Rs. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | 3000071976 | Administrative approval for "Work of comprehensive Maintenance of sewage Treatment Plant at Ghatghar HPS. | 8,85,000.00/- | 12,350.00/- |

Tender Cost: Rs.1180.00
Contact Person: Superintending Engineer, RENEWABLE ENERGY CIRCLE, Ghatghar
Tel. No. 0253 2810185 / 2810485
For further details visit our Web site : https://eprocurement.mahagenco.in

1. All interested vendors are requested to register to our web site for e-tender : https://eprocurement.mahagenco.in
2. Actual quantum of work is to be accessed by the bidder before submitting the tender documents.

Superintending Engineer,
REC Ghatghar

महाराष्ट्र शासन
**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर.**
**जलसंपदा विभाग**
**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**
**कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, छत्रपती संभाजीनगर**
E-mail :- eemid labad@gmail.com दूरध्वनी क्र. ०२४०-२३३४१७९

**ई-निविदा सूचना क्र- १० सन २०२६-२७ (ऑनलाईन)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर. जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामासाठी ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवीत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https// mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१. छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नांव व किंमत :- | ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर येथील कालवा क्र. १ च्या किमी० ते ११ दरम्यान पोहच रस्ता आणि निरिक्षण पथाच्या बाजूला मातीकाम, भराव काम करणे (रु. १८१.९९ लक्ष) जीएसटी वगळून) |
| २. | इसारा/बायना रक्कम :- | या कामांची संबंधीत माहिती महाटेंडर या संकेतस्थळावर सविस्तर निविदा सुचने (NIC) मध्ये देण्यात आलेली आहे. |
| ३. | काम पूर्ण करण्याचा कालावधी | १२ महिने |
| ४. | ई-निविदा संचाची किंमत - | रु.२०००/- + GST १८% एकूण रु. २३६०/- |
| ५ | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग :- | निविदेतील अटी व शर्ती पुर्ण करु शकणारे सर्व पात्र कंत्राटदार |

१. ई निविदा उपलब्ध कालावधी दि. ११/०९/२०२६ ते दि. १८/०९/२०२६
२. ई निविदा उघडणे दिनांक : २१/०९/२०२६ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे
३. खालील संकेतस्थळावर ई निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे. https://mahatenders.gov.in
४. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातील सूचना फलक.
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवर कळविण्यात येईल.)

जा.क्र/लपावि-१/लेखा-३/५७८५
लघु पाटबंधारे विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय.
दिनांक:-१०/०९/२०२६

**स्वाक्षरीत/-**
**(उमेश वानखेडे)**
**कार्यकारी अभियंता**
**लघु पाटबंधारे विभाग क्र.१,**
**छत्रपती संभाजीनगर**

डीजीआयपीआर/२०२६-२०२७/२७८४